व्ही बी एस

# जंगलामधील लढाईत टिकून राहणे

येशू ख्रिस्तामध्ये आपण कोण आहोत हे शिकणे

## व्ही बी एस हस्तपुस्तीका

# जंगलामधील लढाईत टिकून राहणे.

येशू ख्रिस्तामध्ये आपण कोण आहोत हे शिकणे

व्ही बी एस हस्तपुस्तीका

(सुटीतील पवित्र शास्त्र शाळा)

"मुले महत्वपूर्ण आहेत" द्वारा एक नविन व्ही बी एस

वेब:

WWW.CHILDRENAREIMPORTANT.COM/JUNGLE/

"मुले महत्वपूर्ण आहेत" च्या संपूर्ण समूहाचे आभार!

मुख्य प्रकाशक: क्रिस्टीना क्रॉस

क्रिएटिव टीम: डद्विघ्त क्रॉस, फ्लोर बोल्दो,जेनिफर सांचेज़ निएतो,माइकल कंगास,मोंसेर्रत दुरन दिअज़,सुकी कंगास,वेरोनिका तोज आणि विक्की कंगास.

ह्या कार्यक्रमासाठी नवीं गीते लिहिल्या बद्दल माइकल कंगास आणिजोशुआ मेंडोजा चे आभारी आहोत.

भाषांतर चमू:

अली अतुहा, अलिने ज़ेवियर,अनुपमा वानखेड़े, अरोमा पब्लिकेशन, ब्लेसी जेतेन्दर, ब्लेसी जैकब, कार्ला मायुमी, डेविड राजू,एफ्रेम न्जुगुना मिरोबी,फिन्नी जैकब कुरुविल्ला,जेतेन्दर सिंह, मार्कोस रोचा,मैथू दास, नस्सिम बौगतई,पौल म्वांगी, पौल सेप्तन, रुबीना राय,सबरीना बैनी जॉन आणि सब टाइटल मी.

## “जंगलामधील लढाईत टिकून राहणेव्ही ”

## बी एस हयात आपले स्वागत आहे!

तुमची दुर्बिन आणि प्रवासाची पिशवी घ्या व जीप मध्ये बसा, कारण जंगल व्ही बी एसची वेळ झाली आहे! आपल्या सभोवतालचे जग हे जंगला सारखे आहे, जिथे इतर आपला गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करतात, आपल्या कडून चोरी करतात किंवा आपला दूरउपयोग करून घेतात तरी आपण टिकाव धरणे शिकतो. परंतू आपण येशू ख्रिस्तामध्ये कोण आहोत हे शिकल्यानंतर आपण धैर्यवान किंवा आत्म विश्वासू असू शकतो. म्हणून, विश्वास धरणारे पुष्कळ ढगांसारखे साक्षीदार सभोवती असल्याने आपल्याला अडथळा आणणाऱ्या सर्व गोष्टी तसेच सहजासहजी गुंतविणारे पाप आपण दूर फेकू या व जी शर्यत आपल्यासमोर आहे ती शर्यत आपण चिकाटीने पूर्ण करू. इब्री 12:1 जसे आपले ध्येय वचन सांगते की, आपण आपल्या पूढे होऊन गेलेले जे लोक त्याच्या कडून प्रेरणा प्राप्त करतो हयासाठी की आपण आत्म विश्वासाने आपली भिती, पाप व हल्ले हयांचा सामना करावा. हया व्ही बी एस मध्ये आपण दाट जंगला मध्ये जाणार आहोत आणि त्यातून पलिकडे हे समजून निघणार आहोत की आपण धैर्य, दयाळूपणा, समाधान व सामर्थ्य असलेले असे देवाच्या कुटुंबाचा भाग आहोत! नेहमी प्रमाणे तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांना सर्व कार्य एकत्रित करायला लावू शकता, किंवा तुम्ही त्यांना गटात विभागून प्रत्येक कृतीच्या स्थानकावर आळी पाळीने पाठवू शकता. तुम्ही नेहमीचा फराळ देवू शकता किंवा त्या दिवसाच्या पाठासाठी जो फराळ सुचविला आहे तो देवू शकता. हस्तकला अधिक मजेची राहील, जिथे मुलांना प्राणि तयार करणे आवडेल आणि ते त्या प्राण्यांवर आधारित असतील ज्यांना तुमचे मुलं आधी “बोगलीचे साहस” हया नाटिकेमध्ये भेटले आहेत. सजावट मजेशीर करण्यासाठी प्रत्येक स्थानकाला मजेशीर नाव देण्यात आले आहे. दररोजच्या पवित्र शास्त्रातील तुमच्या विद्यार्थ्यांना काढण्यासाठी पाठात 5 चित्र आहेत आणि मुलांना विशेषतः त्यांच्या पुस्तकामध्ये लपलेले कोडे आवडतील! हे जंगलाचे ध्येय, व्ही बी एसला मजेदार बनवेल, सजावटीसाठी रोमांचक, आणि करण्यासाठी सोपे सर्जनशील कल्पना.

“जंगलामधील लढाईत टिकून राहणे” व्ही बी एस, हे जगात आपल्यावर कितीही हल्ले झाले तरी ख्रिस्तामध्ये आपण कोण आहेत हे शिकण्यासाठी मदत करणे हया बद्दल आहे. दलीला कडून आपण जे लोक चलाखीने आपला फायदा घेतात, आखानाकडून चोरी करणारे, हमाना कडून जे आपल्यावर थेट हल्ला करतात, आणि गल्याथाकडून जे धैर्याने आपल्याला धमकी देतात त्यांच्या बददल शिकू. आपण देवाच्या कुटुंबाचा भाग असतांना त्याच्या बरोबर, आपण मजबूत, समाधानी, दयाळू, शूर! चौथ्या दिवशी आपण मुलांना त्यांचे मन येशू ख्रिस्ताला घेवून त्याच्या साठी जीवन जगण्याची संधी देवूया. तुम्ही “टीकणार्यांचा कार्यक्रम” असे दर्शवुन तुमच्या व्ही बी एस मध्ये अधिक रस आणू शकता, जिथे तुम्ही कोण जिंकले, कोण टिकले व कोण छान खेळले हे दाखविण्यासाठी थेट स्पर्धा दाखवू शकतात. जितके ज्यास्त तंत्रज्ञान (खरे किंवा काल्पनिक) वापराल तितकी ज्यास्त तुमची मंडळी अदयावत वाटेल. हया सुटटीत तुमच्या मंडळी बरोबर घनदाट जंगलामध्ये जाण्यासाठी तुम्ही तयार आहात का? हया नविन “जंगलामधील लढाईत टिकून राहणे” व्ही बी एस मध्ये तुमच्यासाठी साहस वाट पाहत आहे!



क्रिस्टीना क्रॉस

संपादकः “मुले महत्वपूर्ण आहेत”

## साहित्य कसे वापरावे

### आमंत्रण देणे

अनेक मंडळया त्यांच्या समाजाला सुटीतील पवित्र शास्त्र शाळा किंवा व्ही बी एस साठी आमंत्रित करण्यासाठी उत्साहित असतात. लोकांना आमंत्रित करण्यासाठी सर्वात सामान्य प्रकार सामाजिक ठिकाणी, दुकानां मध्ये किंवा सार्वजनिक वाहनांवर पोस्टर लावणे आहे. तुम्ही स्वतः व्यस्त ठिकाणांवर जाऊन हस्तपत्रिका देवू शकता, हयासाठी आम्ही पोस्टर व हस्तपत्रिका तयार केल्या आहेत. जाहिरातीचे हे साधनं आमच्या बेवसाइटवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहेत तुम्ही ते छापू शकता. आणखी एक चांगला मार्ग हा आहे की सर्वांना जंगलातील प्राण्यासारखा पोषाख घालून रस्त्यावरून मिरवणूक काढावी व आमंत्रण व गोळया दयाव्या. काही मंडळी झाकी तयार करतात किंवा मिरवणूकीसाठी गाडयाही सजवितात! तुमचे आमंत्रण, पोस्ट कार्ड, पोस्टर, टी शर्ट इ. तयार करण्यासाठी मुख्य लोगो, ग्राफिक कला आमच्या वेबसाइटवर मोफत उपलब्ध आहेत. तुम्ही हयासाठी प्रयत्न करू शकता! मुलांनी शुभवर्तमान ऐकले पाहिजे आणि त्यासाठी व्ही बी एस उत्तम वेळ आहे.

### भरती क़िवा निवडणे

तुमच्या व्ही बी एस मध्ये विशेष कार्य करण्यासाठी विशिष्ट लोक निवडा. तुमच्या व्ही बी एस ची जाहिरात आधी पासून करा, जेणे करून तुमची मंडळी येणा-या मोठया कार्यक्रमासाठी उत्तेजित होईल. वेळ आहे तेव्हाच स्वयंसेवक निवडा आम्ही शिफारस करतो की तुम्हाला ज्या कामाची गरज आहे त्याची यादी करा आणि त्या कामामध्ये कोणती व्यक्ति उत्तम आहे त्याचा विचार करा. मग त्या “विशिष्ट कामासाठी” त्यांना आमंत्रित करा. त्यांनी कार्य करणा-या यादीवर सही करणे ही कल्पना चांगली आहे जेणे करून ते इतर स्वयंसेवक कोण आहेत ते पाहू शकतील. व्ही बी एस मध्ये भाग घेऊन मुलांची सेवा मनोरंजक आहे हे तुम्ही दाखवू शकता. मुलांच्या सेवेतील सर्व स्वयंसेवक शिक्षक नसावे. पुढील पिढीला उंचविण्यसाठी आपल्याला ख्रिस्ताच्या संपूर्ण शरीराची गरज आहे.

### संघ

तुमच्या व्ही बी एस साठी स्पर्धा मजेशिर ठरू शकतात, परंतू लक्षात ठेवा कि हे ऐच्छिक आहे. सर्व संघांमध्ये साम्य ठेवाण्यासाठी संघाना वयानुसार विभागा. प्रत्येक गटाला तुम्ही रंग किंवा नाव देवू शकता, कल्पना ही आहे की त्यांना टिकलेले असे वाटले पाहीजे. वयाप्रमाणे विभागल्यास प्रत्येक गटामध्ये सर्व वयाचे मुलं राहतील.

प्रत्येक संघासाठी कर्णधार निवडा, जो त्यांचा पुढारी बनून त्याच्या संघाला प्रोत्साहित करू शकेल. दर रोज संघांना प्रोत्साहित करण्यासाठी किंवा मिरवणूकिसाठी 15-30 मिनिट लागतील. ते एकत्र प्रार्थना करू

शकतात आणि जिकंण्याच्या योजनाही करू शकतात. आम्ही असे सूचवू इच्छितो की हया सभा मुख्य खोलीत व्हाव्या, प्रत्येक गट एका कोप-यात. अशा प्रकारे तुम्ही तयारी करतांना इतर गटांचेही ऐकू शकता, हया मूळे उत्साहाचे वातावरण तयार होईल. गुण देण्यासाठी सर्वात सोपी जागा म्हणजे "दलदलीतील खेळ" परंतू तुम्ही तुमच्या पुढा-यांना लक्ष ठेवण्याला लावू शकता की कोणते मुलं चांगले वागत आहेत, स्वच्छतेत मदत करत आहेत, दयाळूपणे वागत आहेत किंवा लहान मुलांना मदत करत आहेत. अशा मुलांना अधिक गुण देता येतील ज्यामूळे त्यांच्या संघाला पूढे जाण्यासाठी मदत होईल.

पहिल्या दिवशी संघ वेगळे करा व प्रत्येकासाठी नाव निवडा. प्रत्येक मुलाचे नाव लक्षात ठेवण्यासाठी खेळ तयार करा. दुस-या दिवशी एक विनोद शिका किंवा संघासाठी एकत्रित गाणे गा. तिस-या दिवशी ते शुक्रवारी येतील तेव्हासाठी एखादा झेंडा किंवा पोस्टर तयार करा. चौथ्या दिवशी शेवटच्या दिवसाच्या कार्यक्रमाचा सराव करा. त्यात प्रोत्साहन, सजवलेला झेंडा व प्रेक्षकांसाठी अभिवादन असले पाहीजे. आणि शेवटच्या दिवशी प्रत्येक संघ समोर जाऊन त्याच्या संघाची ओळख करून देइल, त्यांचा झेंडा दाखवेल व सर्व गटांना अभिवादन करेल. आठवडाभर साठविलेल्या अंकासह विजेता होण्यासाठी कोणता संघ उत्तम आहे त्याची निवड करा.

संघांच्या नावांसाठी सल्लाः ॲमेझान वासी, टिकलेले, साहसी, दर्यावदी किंवा शोधक.

आठवडयाच्या शेवटी जिंकणा-या संघासाठी बक्षीस तयार करा.

## अदलाबदल

तुम्ही व्ही बी एस तुम्हाला पाहीजे तसे वापरू शकता, परंतू ते एका वेळेस तीन स्थानक विचारात घेऊन लिहिण्यात आले आहे. हयाचा अर्थ हा कि तुम्ही मुलांना तीन गटात विभागता, आणि गट दिलेल्या तीन स्थानकावर आळीपाळीने जातातः "गूहेतील वर्ग", "पवित्र शास्त्रातून प्रवास करणे" आणि "धबधबा हस्तकला". प्रत्येक स्थानकावर 20 ते 40 मिनिट लागतील, आणि प्रत्येक स्थानक दिवसातून तीनदा येईल जेणे करून प्रत्येक गटाला दिवसातून एकदा तरी प्रत्येक स्थानकावर जाता येईल. मुलांना विभागन्यासाठी विदयार्थी कार्य पृष्ठा प्रमाणे सर्वात सोपा मार्ग वयानुसार आहेः

- सोपे 4-6 वर्षाचे
- मध्यम 7-9 वर्षाचे
- कठिण 10-12 वर्षाचे

परंतू तुम्ही तुमच्या गटाला आधिक संघामध्ये विभागले असल्यामूळे तुम्ही त्यांचाही उपयोग करू शकता. आम्ही सल्ला देवू इच्छितो की तुम्ही किशोरवयीन किंवा मोठया मुलांना 13 वर्षावरील मुलाना तुमच्या व्ही बी एस साठी मदतनीस म्हणून वापरावे. तरीसुध्दा कठिण विदयार्थी पुस्तक हे मोठया मुलांसाठी व प्रौढांसाठीही मजेचे ठरेल. स्थानकांवर आळीपाळीने अदला बदल करण्याचा आमचा आवडता प्रकार म्हणजे

जेव्हा बदलण्याची वेळ येईल तेव्हा संगीत वाजवावे जेणे करू उत्साह टिकून राहील. आम्ही “दललीतील खेळ” व फराळ “उष्णकटीबंधीय उपहारगृह” वेगळे केले कारण सर्व विद्यार्थ्यांसोबत ते सोपे आहे. आणखी एक पर्याय म्हणजे पवित्र शास्त्रातील वचन पाठ करण्यासाठी किंवा कृतीपर गीत शिकण्यासाठी किंवा दोहोंसाठी असे तुम्ही 6 स्थानक ठेवू शकता, किंवा दोन गट आणि 3 स्थानक ठेवू शकता. तुम्ही तुमच्या आवडीनुसार तुमच्या कार्यक्रमाचे वेळापत्रक ठरवू शकता!

## वेळापत्रक (३-५ तास)

सुरवात

- संगीत
- प्रस्तावना
- नाटक

### संघ

### दैनंदिन कार्य (15-30 मिनिट)

### अदलाबदल (संघ किंवा वय) (15-30 मिनिट)

- गुहेतील वर्ग
- पवित्र शास्त्रातून प्रवास करणे
- धबधबा हस्तकला

### खेळ (30-45 मिनिट)

### फराळ (15-30 मिनिट)

### एकत्र समारोप (15-30 मिनिट)

- संगीत
- सूचना व समारोप

## नाटक

नाटकं हे प्रत्येक दिवसाच्या धडयाची ओळख करून देण्यासाठी व जे काही ते शिकत आहेत त्याला दैनंदिन जीवनाशी जोडण्यासाठी गंमतीचा मार्ग आहे. आम्ही सल्ला देवू की सारखेच पात्र वापरा आणि त्यांनी संपूर्ण कार्यक्रमात पोषाख घालूनच रहावे. ते दिवसभर स्थानकांवर जाऊन मुलांना अभिवाद करू शकतात, त्यांच्या बरोबर सेल्फी किंवा फोटो घेवू शकतात.

हया नाटकांमध्ये जेव्हा बोगली दररोज शाळेला वेळेवर येण्यासाठी धडपडत असतो तेव्हा जंगलातील प्राणि एकतर त्याला प्रोत्साहित करतील किंवा त्याला निराश करतील. तो त्याच्या शिक्षकांबद्दल बोलतो परंतू तुम्ही त्यांना कधीच पाहत नाही. बोगलीच्यावर होणारे प्राण्याचे हल्ले असे वाटले पाहीजे जसे मंडळी मध्ये त्यांच्या वर होणारे नेहमीचे हल्ले असतात.

अधिक गंमती साठी आपण मोबाइल, आणि फेसबुक/व्हाटस्अॅप/यू टयूब किंवा सेल्फी घेणे हया सारख्या गोष्टीचा उपयोग करणार आहोत. हे जंगलातील तंत्रज्ञाना बरोबर गंमतीशीर असले पाहीजे. आणखी एक विनोद म्हणून बोगलीचा आवडता नाश्ता आहे जो तो दररोज खातो. हा नाश्ता म्हणून तुम्ही तुमच्या परिसरातील कुठलाही नाश्ता तयार करू शकता. सजावटीसाठी तयार केलेली जीप ही दररोज त्याचा बिछाना असेल. नाटकांची रचना अशी केलेली आहे की एक जंगलातील मुलगा “बोगली” व दोन प्राणि दररोज राहतील. दररोज दोन वेगवेगळे प्राणि असू शकतात त्यांच्यासाठी मुखवटे वापरावे. एक तिसरा प्राणि पाचव्या दिवशी येतो परंतू पडदयाआड राहतो. अशा आहे की तुम्ही बोगली व प्राणी हयांच्या बरोबर मजा कराल!

मुखवटयांसाठी सर्व रचना हया व्ही बी एस साठी आमच्या वेबसाइटवर मोफत ऑनलाइन उपलब्ध आहेत.

http://www.childrenareimportant.com/jungle/


दररोजच्या नाटकांमध्ये वापरण्यासाठी खरडयाची जीप तयार करा. ती कशी तयार करावी हयासाठी यू टयूबवर व्हीडिओ पहा! .......

https://www.youtube.com/watch?v=KEwQpAqHNkk









## स्थानक




### पवित्र शास्त्रातून प्रवास करणे

त्या नदीमध्ये आपले स्वागत आहे ज्यात आपण बोटीत बसून पवित्र शास्त्रातून प्रवास करणार आहोत! मुलांना प्रत्येक दिवसाच्या पाठाचे शिर्षक, घोषणा व पाठांतर वचन बोलू दया. नंतर, विद्यार्थी पुस्तकं दया, आणि त्यांना लपलेल्या कोडया पासून सुरवात करू दया. शेवटी तुमच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पुस्तकातील 2 कृती करू दया व रंग भरू दया.




### गुहेतील वर्ग

गुहेतील वर्गात शिक्षक पवित्र शास्त्रातील गोष्ट सांगतिल, व मुलं प्रत्येक गोष्टीसाठीचे चित्र काढतील. चित्र पवित्र शास्त्रातील इतिहास सांगण्यासाठी तयार केलेले खूप चांगली कलाकृति असे नव्हे तर असे तयार केलेले आहेत जे विदयार्थी स्वतः उतरवू शकतील. एकदा चित्र काढून झाले की मुलांना मतदान पोस्टरच्या भोवती एकत्र करा व प्रश्न विचारा आणि दोन पर्याय मोठयाने वाचून दाखवा. “मत” व “मतदान वेळेची” कल्पना ही आहे की तुमच्या विद्यार्थ्यांना विचार करायला लावणे, तुम्ही दोन्ही बाजू स्पष्ट केल्या पाहीजे. दोन्ही पर्याय वाचा व दोन्ही बरोबर आहेत असे भासवा. प्रत्येक विदयार्थी त्याच्या वयोगटानुसार पोस्टर व सही करेल व त्याचे मत निवडेल. इच्छा असल्यास तुम्ही मतदानासाठी स्टीकरचाही उपयोग करू शकता. एकच उत्तर बरोबर असे न दाखविण्याचा प्रयत्न करा.




### धबधबा हस्तकला

हया स्थानकावर विद्यार्थी पाठ लक्षात ठेवण्यासाठी हस्तकलेचा आनंद घेतील आणि त्यांना घरी नेण्यासाठी काहीतरी मजेशिर मिळेल. हस्तकलेसाठी सर्व नमूने व आमच्या वेबसाइटवर ऑनलाइन उपलब्ध आहेत व त्याचे कृती हया हस्तपुस्तिकेत उपलब्ध आहे.




### उष्णकटिबंधीय उपहार गृह

जसे प्रचलन आहे तसे तुम्ही नेहमीचा फरळ, उदा. चहा किंवा दुपारचे जेवण देवू शकता. परंतू आमच्या फराळाच्या कल्पना खाण्यासाठी योग्य असण्या बरोबरच व्ही बी एस साठी गंमतीची कृती अशा आहेत. फरळा बरोबर तुमच्या व्ही बी एस मधील सर्व लोक कृतीचा आनंद घेतील. जे पदार्थ तुमच्या कडे मिळत नाही ते बदला व गंमत करा!




### दलदलीतील खेळ

खेळल्याने ज्ञान वाढते, संवादाला प्रोत्साहन मिळतं आणि मुले आनंदी होतात. हया मुळे व्ही बी एस मध्ये आम्ही खेळाचा समावेश करतो ज्यात मुले अनुभव सांगतील, पाळी पाळीने कार्य करतील व इतरांचे ऐकतील. प्रत्येक पाठासाठी एक खेळ निवडा किंवा दोन्ही खेळा. मुलांना वयानुसार दोन गटांमध्ये विभागा व खात्री करा की प्रत्येक गटात लहान, मध्यम वयीन व किशोर वयाचे मुले आहेत. पहिल्या दिवशी संघ तयार करा व त्यांना आठवडा भर तसेच ठेवा!

## अधिक कल्पना

### टेबल सजविणे

मोठया टेबलावर कथ्था किंवा हिरवा कापड टाकून सुरवात करा. वेगवेगळया टोपल्यां व भांडे ठेवा व



त्यात माकडाची खेळणी ठेवा आणि तुमच्या प्रदेशा उपलब्ध असलेले फळ किंवा गोळया ठेवा जेणे करून जंगलाचा देखावा तयार होईल.

### जंगलातील शरबत



तुम्ही ऑरेन्ज किंवा लिंबू सोडयाने सुरवात करू शकता व नवीन लेबल जंगलातील पानं किंवा जंगल शरबत असे लिहून स्वतःचे शरबत तयार करू शकता.

### माकडांसाठी केळी



एक ताट किंवा टोपली केळींनी भरा व त्याला खेळण्याच्या माकडाने सजवा. आम्ही असा संदेश लावला की “माकडा तुझ्यासाठी केळी आहेत” मुलांना हा मजेशीर फराळ आवडेल.

### वाघाचे तोंडं

आम्ही लहान मोसंबी किंवा संत्री वापरलेली आहेत, तुम्ही तुमच्या प्रदेशातील कोणतेही नारंगी रंगाचे फळ वापरू शकता. काळा मार्कर पेन वापरून प्रत्येक फळावर वाघाच्या तोंडासाख्या रेषा काढा. मुलांना वाघाचे तोंड निवडतांना मजा वाटेल.




### जीवंत अळया

जर तुम्हाला गमच्या अळया मिळाल्या तर त्या उत्तम ठरतील. त्यांना धुतलेल्या पानांवर किंवा



भांडयामध्ये ठेवा व त्यावर चिन्ह लावा “जीवंत अळया” किंवा “हकूनामटाटा.”




## वाघाचे पंजे

नारंगी रंगाचे चिटो हया कल्पनेसाठी उत्तम आहेत, परंतू तुम्ही तुमच्या भागात उपलब्ध कोणताही नारंगी फराळ वापरू शकता.  तुम्ही गाजराचे लहान तुकडे कापून त्यावर चिन्ह लावू शकता “वाघाचे पंजे”






## स्वादिष्ट मुंग्या

हा फराळ तयार करण्यासाठी मणूके व इतर छोटे खाण्याचे पदार्थांचा उपयोग करून एका भांडया पर्यंत जाणा-या मुंग्यांसारखी रांग तयार करा.  कोणाला हे खाण्याचे धैर्य आहे असे म्हणा व मुलांचे चेहरे पहा.




## साप

हया फराळासाठी आम्ही काकडी पासून सुरवात केली. कोणतीही हिरवी भाजी चालेल.  डोक्याचा 4 सेमी भाग सोडून गोल चकत्या कापा. लाल मिरची किंवा टमाटर वापरून डोळे व जीभ तयार करा व तोड सजवा.

## पाण्याची बाटली

साहित्य

- दोन प्लास्टिकचे ताटं अंदाजे 10 सेमी व्यासाचे
- चिटकवण्यासाठी डिंक किंवा फेविकॉल
- कैची
- हिरवा व कथ्था कागद किंवा रंग व ब्रश
- टॉयलेट पेपर च्या आतील गोल खरडा किंवा तशा प्रकारची एक गोल पुंगळी
- रिबिन किंवा दोर



### कृतिः

- ताटावर वरच्या भागाला यू हे अक्षर काढा असे की ते गोल खरडा किंवा पुंगळीच्या आकाराचे असेल.
- तो आकार कापा व दोन्ही ताट बरोबर एकमेकांना लावा.
- जिथू यू आकार काढला आहे तिथे गोल पुंगळी चिटकावा.
- ताटं सुध्दा एकमेकांना चिटकवा.
- तुम्ही मुलांना त्यांची ही बाटली रंग किंवा रंगीत कागदं वापरून सजवायला लावू शकता.



दोन बाजूला छोटे छिद्र करून त्याला दोरी बांधा.

# पाठ 1

## येशू खिस्त मला मजबूत बनवितो

### मुख्य मुद्दा (पाठ 1)

मला कमजोर वाटत असले तरी मी प्रभू मध्ये बलवान आहे.

### पवित्र शास्त्रातील धडा (पाठ 1)

दलीला गैरफायदा घेते (शास्ते 16:1-31)

### प्रस्तावना (पाठ 1)


हा नवीन कार्यक्रम आहे टिकाणारा अनेक भाग घेणा-यांची हे पाहण्यासाठी परीक्षा घेईल की कोण विजयी होऊन जिंकू शकतो!

“जंगलामधील लढाईत टिकून राहणे” हयात आपले स्वागत आहे.

दररोज लोक तुम्हाला त्यांच्या फायदयासाठी त्यांच्या मर्जी प्रमाणे वागायला सांगून तुमचा दुरऊपयोग करित असतात. परंतू जेव्हा आपण येशू ख्रिस्तामध्ये कोण आहोत हे शिकतो तेव्हा आपण आत्मविश्वासू असू शकतो. (आजच्या पवित्र शास्त्रातील वचनाची ओळख करून द्या 2 करिंथ 12:10) आज आपण बोगलीला भेटणार आहोत आणि हे पाहूया की तो सापाच्या गैरफायदा घेण्यावर कसा विजयी होतो. आपल्या फराळाच्या वेळेस आपण ताकत प्राप्त करण्यासाठी वजन उचलू व हस्तकलेच्या वेळी अस्वल तयार करू व खेळ सुध्दा खेळू! जेव्हा आपण पवित्र शास्त्र उघडू तेव्हा आपण पाहू की कशा रितीने दलीलाने शमशोनाचा गैरफायदा घेतला आणि शेवटी तो त्याच्या शक्तिने कसा विजयी ठरला. एकत्र मिळून आजचा मुख्य मुददा म्हणू या, “मला कमजोर वाटत असले तरी मी प्रभू मध्ये बलवान आहे.” दिवसाच्या शेवटी तुम्ही आणि मी खात्री बाळगावी की जेव्हा येशू ख्रिस्तामध्ये आपण बलवान आहोत हे आपल्याला समजेल तेव्हा आपण जंगलातील लढाईत टिकून राहू.

### प्राणी (पाठ 1)

साप दुरऊपयोग करतो आणि अस्वल मदत करते.



## संघ (पाठ 1)

दोन संघात विभागणी करा आणि प्रत्येक संघासाठी नाव निवडा. नावं पाठ करण्यासाठी खेळ खेळा.

## पवित्र शास्त्रातील वचन (पाठ1)

*"या कारणासाठी ख्रिस्ताकरिता अशक्तपणात आनंद करतोअपमानात ., कठीण परिस्थितित, छळात, अडचणीच्या वेळी, कारण जेव्हा मी अशक्त, तेव्हा मी सशक्त असतो." 2 करिंथ 12:10*

## नाटक (पाठ 1)

बोगली जंगलात त्याच्या जीप मध्ये झोपलेला आहे व त्याच्या फोनचा गजर वाजत आहे. तो सारखा सारखा तो बंद करतो आणि अचानक त्याच्या लक्षात येते की उशीर झाला आहे! तो उठतो व जीपच्या बाहेर उडी मारतो. बोगली हे म्हणत धावत राहतो की त्याला जंगलाच्या शाळेला उशीर झाला आहे आणि पटकन त्याचा मित्र अस्वल हयाला व्हाटसॲप संदेश पाठवितो. बोगलीला मुलांना त्याच्या जंगलातील शाळेबद्दल सांगू दया परंतू आता त्याला शाळेसाठी उशीर झाला आहे म्हणून त्याला नाश्ता करता येणार नाही. त्याला भिती वाटत आहे की त्याचे शिक्षक त्याला उशीर झाल्या मूळे शिक्षा करतील. लवकर लवकर तयारी करतांना त्याचे पोट दुखू लागते आणि नाश्ता न केल्या बद्दल त्याला वाईट वाटते. साप येऊन बोगलीला नाश्ता करायला थांबण्यासाठी सांगतो. साप त्याला भूरळ घालतो आणि म्हणतो की त्याने फक्त स्वतःचाच विचार करावा. अस्वल सुध्दा येतो आणि बोगलीला प्रोत्साहन देतो की त्याने शाळेला वेळेवर गेलेच पाहीजे! बोगली मोहात पडतो कारण साप त्याचा आवडता नाश्ता वाढू लागतो. ; तुमच्या भागातील आवडता नाश्ता वापरा आणि दररोज व्ही बी एस साठी तयार ठेवा; बोगली म्हणतो हे! तुला हात नाहीत! तू नाश्ता कसा वाढत आहेस? तो दोन्ही प्राण्याना सोडून धावू लागतो. जेव्हा बोगली जंगल शाळेत पोहचतो तेव्हा तिथे फळांनी भरलेले मोठे ताट व त्याचा आवडता नाश्ता असतो! शाळेत त्या दिवशी विशेष दिवस असतो आणि त्यांनी सर्वांसाठी नाश्ता तयार केलेला असतो!!! बेगली अस्वलाला आणखी एक व्हाटसॲप संदेश पाठवितो आणि म्हणतो, वा! जरी मला मी कमजोर असे वाटत असले तरी मी बलवान आहे कारण देव माझया बाजूने आहे! मी आज सकाळी कमजोर होतो व गजर बंद करत राहीला परंतू कोणाला माहीत नाही की वेळेवर येण्यासाठी मी माझा नाश्ता केला नाही! बिना नाश्त्याचे मला दिवसभर कमजोर वाटले असते परंतू आता मला शाळेतील स्वादिष्ट नाश्ता खाऊन बलवान असल्यासारखे वाटत आहे! मला कमजोर वाटत असले तरी मी प्रभू मध्ये बलवान आहे. येशू ख्रिस्त मला बलवान बनवितो.




## गुहेतील वर्ग (पाठ 1)

### दलीला गैरफायदा घेते

(शास्ते 16:1-31)

तुम्ही गोष्टीचा प्रत्येक भाग सांगत असतांना मुलांना दाखविलेले चित्र काढू दया. चित्र जितके साधे ठेवता येतील तितके साधे ठेवा म्हणजे मुलांना ते काढणे सोपे जाईल.



1. शमशोन अतिशय शक्तिशाली होता. शत्रू त्याला पकडू इच्छित होते परंतू कितीही सैनिक आले तरी ते त्याला पकडू शकत नव्हते. सर्वांना माहीत होते की त्याच्या विशाल शक्तिचे काहीतरी गुपीत असावे. पलिष्टी पुढा-यांनी दलीलाला भरपूर चांदीचे नाणे देवू केले. जर तीने शमशोला भूरळ घालून त्याचे गूपित जाणून घेतले तर. शमशोनाचे दलीलावर प्रेम होते, परंतू दलीला पैश्यांवर अधिक प्रेम करत होती.


चित्र 1: चांदीच्या नाण्याची मोठी पिशवी.

2. जेव्हा दलीला शमशोनाला त्याचे गूपीत सांगण्यासाठी गळ घालत होती तेव्हा तिने आजू बाजूला शिपाई तयार ठेवले. त्याने तिला सांगितले की जर मला धनुष्याच्या नविन दोराने बांधले तर मी त्यातून सुटणार नाही, परंतू तो खोटा बोलत होता. जेव्हा तो झोपलेला होता तेव्हा तिने त्याला बांधले, परंतू जेव्हा तो जागा झाला तेव्हा त्याने ते दोर सहज तोडले. तो खोटा बोलला म्हणून ती नाराज झाली. तरी सुध्दा त्याच्या लक्षात आले नाही की ती त्याला फसवित आहे. मग शमशोनाने तिला सांगितले की नवीन दोर त्याला बांधून ठेवण्यासाठी पूरेसे होतील. तीने त्याला पुन्हा बांधले परंतू त्याने तेही सहज तोडले. मग त्याने तिला सांगितले की त्याचे केस कापडात गुंफले तर त्याला पकडता येईल, परंतू जेव्हा तिने तसे केले तेव्हा तिला पुन्हा अपयश आले.




चित्र 2: लांब केसांच्या शमशोन घालीत असे तशा सात वेण्या घातलेले डोके.

3. शेवटी दलीला तिला माहीत असलेला सर्वात चांगला मार्ग निवडला. ती त्याला म्हणाली, “तू माझ्यावर प्रिती करीत नाहीस का? कारण जर तू माझयावर प्रिती केली असती तर तू मला सत्य सांगितले असते”. जर तुमच्या जिवलग मित्राने तुम्हाला असे म्हटले तर त्याला जे पाहीजे ते तुम्ही कराल का? शमशोन तिच्या पूढे हारला व त्याने तिला त्याचे गूपित सांगितले. तो म्हणाला, “माझी शक्ति माझ्या केसात आहे; जर ते कापले तर मी इतर माणसांसारखा दुर्बल होईल.”



चित्र 3: झोपलेला माणूस ज्याचे अर्धे केस कापलेले आहेत.



4. दलीलाला माहीत होते की शेवटी तो खरे सांगत आहे. तिने तो झोपलेला असतांना त्याचे केस काढण्यासाठी एक माणूस बोलाविला आणि शिपाई त्याला पकडण्यासाठी तयार होते. हया वेळेस काम झाले. शिपाई लगेच आत आले आणि टकल्या शमशोनाला पकडून घेऊन गेले, त्यांनी त्याला त्रास दिला आणि तुरूंगात टाकले.

चित्र 4: खिडकीवर सलाखी लागलेले तुरूंग.

5. तुरूंगात असतांना शमशोनाचे केस वाढले आणि त्याच्या लक्षात आले कि त्याची शक्ति ही देवा कडून मिळालेली देणगी होती. त्याला पलिष्टी भक्ति करित असत त्या दागोन नामक देवीप्रित्यर्थ उत्सवात आाणण्यात आले. त्याने देवाला प्रार्थना केली आणि पुन्हा एकदा शक्ति मागितली आणि देवाने शमशोनाची प्रार्थना ऐकली. शेवटी शमशोन पलिष्टयां विरूध्द त्याचे युध्द जिंकू शकला.



चित्र 5: प्रार्थना करणार एक मनुष्य.

## मत

दोन पर्याय वर्गासमोर वाचून दाखवा. मतांची कल्पना ही आहे की तुमच्या विद्‌यार्थ्यांना विचार करायला लावावा, म्हणून दोन्ही बाजू बरोबर असे तुम्ही भासविले पाहीजे. दिलेले दोन पर्याय वाचा आणि ते दोन्ही बरोबर आहे असे दर्शवा. पहिजे तर तुम्ही मत मांडण्यासाठी स्टीकरचाही उपयोग करू शकता. त्यांना योग्य उत्तर दिसणार नाही असा प्रयत्न करा, परंतू त्यांना स्वतः विचार करण्यासाठी प्रोत्साहन दया.

**प्रश्नः शमशोनाने त्याचे गूपित गुप्त ठेवावे का?**

अ. जर तुम्हाला असे म्हटले; "तु खरंच माझ्यावर प्रेम करत असशील तर तू मला तुझे गूपित सांगशील"; तर कोणीही गूपित सांगितले असते. जर मी शमशोन असतो तर मी सुध्दा सांगितले असते.




ब. जर तुम्हाला असे म्हटले की, "जर तु खरंच माझ्यावर प्रेम करत असशील तर तू मला तुझे गूपित सांगशील" तर कोणालाही संशय आला असता व कळले असते की ही युक्ति आहे. जर मी शमशोन असतो तर की माझ्या केसांबद्दल सांगितले नसते.


शमशोना सारखंच आपल्याला रोज भूरळ घालण्याचा प्रयत्न केला जाईल. परंतू आपण कठिण प्रसंगात आनंद मानू शकतो, कारण त्या वेळेसच देव आपल्याला मदत करत असतो! जेव्हा आपण कमजोर आहोत असे आपल्याला वाटते तेव्हा आपण प्रभू मध्ये बलवान आहोत.




## पवित्र शास्त्रातून प्रवास करणे (पाठ 1)

त्या नदीमध्ये आपले स्वागत आहे ज्यात आपण बोटीत बसून पवित्र शास्त्रातून प्रवास करणार आहोत! आजच्या पाठाचे शिर्षक, ध्येय व पाठांतर वचन एकत्र म्हणू या. विदयार्थी पुस्तकं वाटा व त्यांना लपलेले कोडे सोडविण्यापासून सुरवात करायला लावा. नंतर तुमच्या विद्‌यार्थ्यांना पुस्तकात 2 कृती करायला लावा आणि रंग भरायला सांगा.




(मध्यम पुस्तकाचे उत्तरं सोपे व कठिण पुस्तकं वापरून शोधता येतील)

## उष्णकटिबंधीय उपहार गृह (पाठ 1)

### शक्तिचे डंबेल




साहित्यः तुमच्याकडे जे साहित्य उपलब्ध आहे ते निवडा

- बारः बिस्किट, काडया, दात कोरणे, गाजराचे काप.
- वजनः द्राक्ष, चिजचे तुकडे, मार्श मेलो, ऑलिव, स्टाबेरी किंवा टरबूजाचे तुकडे.

कृतिः

- काडयाच्या टोकाला वजन कसे लावावे ते दाखवा.
- मुलांना आपआपले डंबेल तयार करू दया.








## दलदलीतील खेळ (पाठ 1)

1. सापाचा प्रवास

आठ ते दहा गोल किंवा सायकलचे टायर दोरीने एकत्र बांधा किंवा वायर वापरा.  वायर वापरत असल्यास त्यांच्यावर सुरक्षा आवरण असले पाहीजे.  त्यांना मजबूत झाडांवरून खाली सोडा जर झाडं नसतील तर ते पकडण्यासाठी दोन लोकांचा उपयोग करा.  जर लटकविण्याची सोय नसेल तर तुम्ही ते जमीनीवर ठेवू शकता.  प्रत्येक संघ रांग तयार करेल आणि त्या टायर किंवा गोलातून जाईल.

### 2. आमच्या मध्ये इथे

हया खेळासाठी तुम्ही फुगे वापरू शकता, मध्यम आकाराचे किंवा कागदाचे बॉल.

मुलांना एकमेकांपासून दूर करा व त्यांचे डोळे बंद ठेवा त्यांना गोल फिरवू फिरायला लावा. ज्या पहिल्या व्यक्तिला ते पकडतील तिला पकडून ठेवायला सांगा ही व्यक्ति खेळासाठी त्यांची नविन मदतनीस होईल. टीपः हे निश्चित करा की जोडया एका उंचीच्या असाव्या. सुरवातीची व शेवटी रेष आखा, प्रत्येक जोडीला फुगवलेला फुगा दया.  ते पोटाच्या उंचीवर फुगा ठेवतील व दोघांच्या पोटात तो धरून ठेवतील. मग हात न लावता किंवा तो फुटु न देता गोल फिरत फुगा न पाडता शेवटच्या रेषे पर्यंत जातील.




### धबधबा हस्तकला   (पाठ 1)

### अस्वलाला रंग दया

प्रत्येक मुलाला अस्वलाच्या डोक्याचा छापलेला आकार, डोळे व नाक दया.

1. मुलं रंग भरतील आणि डोळे व नाक कापतील. मुलांना काळे डोळे काढून त्याला रंग भरून पांढ-या डोळयावर लावू दया. जेणे करून ते अधिक कल्पक होतील.

2. एका चमच्याच्या मागच्या बाजूला थोडा रंग लावून दाखविल्या प्रमाणे कान कसे तयार करावे ते दाखवा.

3. काटा चमच्याने केस कसे रंगवायचे ते दाखवा, नाका पासून सुरवात करून बाहेरच्या दिशेला जा.

4. डोळे व नाक जागेवर चिटकावा.

कथ्था रंग कसा तयार करावाः लाल, पिवळा व निळा हे रंग समान प्रमाणात एकत्र करावे. जर रंग खूप गडद वाटत असेल तर तुम्ही त्यात थोडा पांढरा रंग टाकू शकता.

### समारोप (पाठ 1)

जसे दलीलाने शमशोन सोबत केले आणि सापाने बोगली बरोबर आज केले तसे लोक आपल्याला भुरळ घालून आपला गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करतील.  असे लोक असतील जे तुमच्या कडून काही तरी घेऊन

घेतील किंवा तुमच्या बाजूचे नसूनही तुमच्या बाजूचे असल्याचा आव आणतील.  परंतू आपण हे जाणून घेवू शकतो की प्रभू येशू ख्रिस्त आपल्या बरोबर आहे आणि तो आपल्याला कधीच सोडणार नाही.  जेव्हा आपण प्रभू मध्ये भरवसा ठेवू तेव्हा आपल्याला कमजोर वाटत असले तरी आपण बलवान राहू शकतो.  आणि जसे आपले पवित्र शास्त्रातील वचन सांगते, आपण आपल्या कठिण प्रसंगी, अडचणीत किंवा कमजारीतही आनंद मानू शकतो कारण तेव्हा ख्रिस्ताचे सामर्थ्य आपल्या जीवनात प्रवेश करते.  आजचा मुख्य मुददा एकत्र म्हणू या “मला कमजोर वाटत असले तरी मी प्रभू मध्ये बलवान आहे.” उदया पुन्हा व्ही बी एसला या, “जंगलामधील लढाईत टिकून राहणे” हयाच्या आणखी एक उत्साहपूर्ण दिवसासाठी. आपण पाहू की टिकणे व जिंकणे हयासाठी जे गुण हवे ते कोणत्या संघाकडे आहेत.



# पाठ 2

## येशू ख्रिस्त मला समाधानी करतो.

### मुख्य मुद्दा (पाठ 2)

आनंदी होण्यासाठी मला जे आवश्यक आहे ते सर्व माझ्याकडे आहे.

### पवित्र शास्त्रातील धडा (पाठ 2)

आखान चोरी करतो (यहोशवा 7:1-23)

### प्रस्तावना (पाठ 2)

काल आपण नवीन टिकणारा कार्यक्रम सुरू केला, जिथे आपल्या संघांनी ते उत्तम आहेत हे सिध्द करण्यासाठी संघर्ष केला. त्यांना कल्पना नव्हती की त्यात किती मजा येईल, आणि येशू ख्रिस्तामध्ये ते कोण आहेत हे शिकण्याचे आव्हान त्यांनी स्विकारले. हॅशटॅग ने ट्विटर वर "जंगलामधील लढाईत टिकून राहणे" याशी आमच्या बरोबर जुळा आणि तुम्हाला काय वाटते ते आम्हाला कळवा. (तुमच्या देशात जो सामाजिक मिडिया वापरण्यात येतो त्याचा वापर करा तुम्हाला नविन अकाउंट तयार करण्याची गरज नाही). दररोज आपण आपल्या भोवती असे लोक पाहतो ज्यांच्या कडे आपल्या पेक्षा अधिक आहे, चांगले कापडे किंवा चांगले फोन. परंतू जेव्हा आपण येशू ख्रिस्ताच्या ठायी आपण कोण आहोत व आपल्याकडे काय आहे हे शिकतो तेव्हा आपण समाधानी राहू शकतो. (आजच्या पवित्र शास्त्रातील वचनाची ओळख करून दयाः फिलिप्पै 4:12) सत्य हे आहे की आपण देवावर भरवसा ठेवून येशूचे अनुसरण करतो तेव्हा आपण खोल आनंद अनुभवू शकतो. तुम्हाला कालचा बोगली आठवतो का? आपण एक मिनिटात त्याला पुन्हा पाहणार आहोत आणि पाहू की जेव्हा तो दुस-यांवर जळफळतो तेव्हा तो त्याचा आनंद व समाधान कसे गमावितो. आज आपण आपले पवित्र शास्त्र उघडून हे शिकणार की कसे जेव्हा एक व्यक्ति चोरी करण्याच्या मोहाला बळी पडला तेव्हा तो त्याचा आनंद गमावून बसला. आपण फराळाच्या वेळेस त्याने चोरलेल्या वस्तू पाहणार आणि हस्तकलेच्या वेळी एक सुंदर हत्ती तयार करणे शिकणार जो आपल्याला आठवण करून देईल की आपण मजबूत व समाधानी राहीलो पाहीजे. सर्व मिळून आजचा मुख्य मुद्दा म्हणू या. आनंदी होण्यासाठी मला जे आवश्यक आहे ते सर्व माझ्याकडे आहे. दिवसाच्या शेवटी तुम्ही आणि मी खात्री बाळगू की आपण जीवनातील जंगलामधील लढाईत टिकून राहू, जेव्हा आपल्याला हे कळून येईल की आपण आपला प्रभू येशू ख्रिस्त हयाच्या मध्ये समाधानी आहोत!

### प्राणि (पाठ 2)

तडस चोरतो आणि हत्ती मदत करतो.

## संघ (पाठ 2)

प्रत्येक संघाला वेगळे होवू दया आणि एकत्र गीत गाऊन किंवा इतर प्रकारे एकमेकांना प्रोत्साहित करू दया.

## पवित्र शास्त्रातील वचन ) पाठ 2(

*“गरजू स्थितीत किंवा सर्व विपुल असताना कसे राहायचे ते मी जाणतोकोणत्याही वेळी आणि सर्व . परिस्थितीत तृप्त राहण्याचे व भुकेले राहण्याचे, भरपूर बाळगण्याचे आणि अपूरेपणात राहाण्याचे अशा सर्व परिस्थितीत राहण्याचे रहस्य मी शिकलो आहे.”* फिलिप्पै 4:12

## नाटक (पाठ 2)

बोगलीचा गजर वाजतो आणि तो जगा होऊन तयार असा जीपच्या बाहेर उडी मारतो! तो आनंदी आहे की तो आज ज्यास्त वेळ झोपला नाही, तो तयार होतो व आनंदाने शिट्टी वाजवत त्याचा आवडता नाश्ता स्वतःसाठी वाढतो. तो केळी खातो आणि साल फेकून देतो. तो त्याचा नाश्ता खात असतांना हत्ती त्याच्या मोबाइलवर गेम खेळत आत येतो व केळीच्या सालावरून घसरतो. बोगलीला हत्तीच्या गेमचा हेवा वाटतो आणि तो त्याच्याकडे पाहत राहतो आणि हत्तीला विचारत राहतो. (जर तुम्हाला मोबाइल गेमच्या ऐवजी तुमच्या क्षेत्रातील दुसरी खेळणी वापरावी असे वाटते तर तुम्ही तसे करू शकता). गेम खेळतांना हसून, व मजा करून हत्ती बोगलीचा हेवा अधिक वाढवितो. तडस आत येतो आणि बोगलीला सांगतो की त्याला हेवा करण्याची गरज नाही कारण त्याच्याकडे एक मार्ग आहे. हत्तीने गेम संपल्यावर फोन खाली ठेवला व तो बोगली बरोबर बोलू लागला, तडस हळूच गेला आणि त्याने फोन चोरला. बोगलीला आश्चर्य वाटते आणि तो तडसाला हत्तीच्या नकळत नाही असे सांगतो. मग अचानक त्याच्या लक्षात येते की पुन्हा त्याला शाळेसाठी उशीर होत आहे. तो वेडया सारखा त्याची पेन्सील शोधत फिरतो. त्याला ती सापडते, परंतू तो ती पुन्हा पाडतो. ( थोडा वेळ शोधण्यात व पेन्सील खाली पाडण्यात घालवा) बोगली मग शाळेला निघतो. शाळेच्या रस्त्यावर असतांना त्याला फेसबुकवर संदेश मिळतो की त्याचा वर्ग आज खेळाच्या मैदानावर एकत्र येणार आहे. आता तो सरळ मैदानावर जावू शकतो आधी चूकीच्या ठिकाणी जावून त्याला वेळ गमवावा लगत नाही, म्हणून तो जेमतेम वेळेवर पोहचतो! आणखी एकदा बोगली वेळेवर पोहचला व तो समाधानी आहे. त्याला त्याच्या फोनवर संदेश मिळाला जो फोन हत्तीच्या फोन सारखा चांगला नाही, आणि जरी त्याच्या फोन मध्ये छान गेम नसले तरी त्याच्या फोनने त्याला शाळेत वेळेवर पोहचण्यासाठी मदत केली. तो म्हणते वा! आनंदी होण्यासाठी मला जे आवश्यक आहे ते सर्व माझ्याकडे आहे! जरी इतरांकडे जी खेळणी आहे ती माझ्या कडे नाही तरी देखील येशू ख्रिस्त मला समाधानी करतो.


## गूहेतील वर्ग (पाठ 2)

आखान चोरी करतो



(यहोशवा **7:1-23**)


तुम्ही गोष्टीचा प्रत्येक भाग सांगत असतांना मुलांना दाखविलेले चित्र काढू दया. चित्र जितके साधे ठेवता येतील तितके साधे ठेवा म्हणजे मुलांना ते काढणे सोपे जाईल.



1. यरीहो भोवती फे-या मारतांना आखान यहोशवाच्या सैन्यातील एक सैनिक होता. जेव्हा भिंत कोसळली तेव्हा देवाने सामर्थ्यशाली रित्या युध्द जिंकले. देवाने सूचना दिली की लोकांनी त्या शहरात जे सापडेल त्यातील काहीही घेवू नये, कापडे, सोने, चांदी किंवा काहीही.

चित्र 1: यरीहो शहराच्या भिंती

2. यहोशवाच्या सैन्याचे दुसरे युध्द आय शहरासोबत होते. जरी त्यांनी सहज जिंकायला हवे होते तरी ते पराभूत झाले. यहोशवाने देवाची प्रार्थना केली, व विचारले की ते का हारले. देवाने उत्तर दिले की तो रागावला आहे कारण लोकांनी देवाने जे सांगितले तसे केले नाही. त्यांना दिसले की देवावरील प्रिती व त्याच्या आज्ञा पाळणे हयाची जागा वस्तूवरील प्रितीने घेतली.




चित्र 2: युध्दात पराभूत झालेल्या सैनिकांची चेहरे.

3. देवाने लोकांना सांगितले कि त्यांनी सकाळी देवासाठी शुध्द व्हावे म्हणजे तो त्यांना चोरून लपविलेल्या वस्तू दाखविल. ही देवापेक्षा वस्तूंवर अधिक प्रिती केल्या बद्दल वळून पश्चाताप करण्याची वेळ होती. आखानासाठी ही पश्चाताप करून देवाकडे वळण्याची संधी होती. त्याने लक्षात घेतले पाहीजे होते की त्याला आनंदी जीवन जगण्यासाठी व देवाला संतोषविन्यासाठी ज्या गोष्टींची आवश्यकता होती त्या त्याच्याकडे होत्या.



चित्र 3: घुडघ्यावर होऊन देवाबरोबर बोलणारा यहोशवा.

4. दुस-या दिवशी यहोशवाने प्रत्येक वंशाला, मग प्रत्येक कुटुंबाला आणि नंतर कुटुंबातील प्रत्येकाला पूढे बोलाविले. देवाने यहोशवाला दाखवून दिले की आखान दोषी होता. जेव्हा आखानाला विचारले तेव्हा त्याने सांगितले की त्याला सुंदर व किमती वस्तू दिसल्या तेव्हा त्याला त्या स्वतःसाठी हव्या होत्या. म्हणून त्याने त्या घेतल्या आणि त्याच्या तंबूत जमीनीत पूरल्या. यहोशवाने त्याच्या तंबूत



माणसे पाठविली आणि त्यांना आखानाने सांगितल्या प्रमाणे वस्तू सापडल्या.  यहोशवाने त्या मोलवान वस्तू त्याच्याकडून घेतल्या व त्या देवाला दिल्या, आणि आखाणाला शिक्षा देण्यात आली.

चित्र 4:  आखानाने घेतलेल्या वस्तूः सुंदर झगा, सोन्याची विट आणि चांदीचे नाणे.



5. देवाने यहोशवाला सांगितले भिऊ नको, "तुझे सैन्य घेऊन पुन्हा आय शहरात जा मि तुला विजय देईल."  आणखी एकादा देवाने त्यांना सांगितले की त्यांना हव्या असलेल्या वस्तू त्यांनी त्या शहरातून घेवू नये.  हया वेळी सर्वांनी आज्ञा पाळली आणि त्यांनी सांगितल्या प्रमाणे शहर जाळून टाकले.  त्यांनी युध्द जिंकले आणि ते आनंदात होते कारण देव पुन्हा त्यांना जिंकण्यासाठी मदत करत होता.

चित्र 5: शस्त्र उंच करून आनंदी चेहरा असलेले सैनिक.

## मतं

दोन पर्याय वर्गासमोर वाचून दाखवा.  मतांची कल्पना ही आहे की तुमच्या विद्यार्थ्यांना विचार करायला लावावा,  म्हणून दोन्ही बाजू बरोबर असे तुम्ही भासविले पाहीजे.  दिलेले दोन पर्याय वाचा आणि ते दोन्ही बरोबर आहे असे दर्शवा.  पाहिजे तर तुम्ही मत मांडण्यासाठी स्टीकरचाही उपयोग करू शकता. त्यांना योग्य उत्तर दिसणार नाही असा प्रयत्न करा, परंतू त्यांना स्वतः विचार करण्यासाठी प्रोत्साहन दया.

**प्रश्नः आखानाने काही वस्तू घेणे योग्य होते का?**

अ. आखानाला कळायला हवे होते की देव सर्व काही पाहतो आणि आज्ञाभंगाची शिक्षा मिळेल. त्याने वस्तू घेऊन लपविल्या हे चूकीचे केले.

ब. आखानाला माहीत होते की शहर नष्ट केले जाणार आहे आणि काही वस्तू घेतल्या तर कोणाच्या लक्षात येणार नाही कारण त्या नाही तरी नष्टच केल्या जाणार होत्या.  त्याला माहीत होते कि जर त्याने त्या नीट लपविल्या तर तो पकडला जाणार नाही.

मला देखील इतरांकडून व देवाकडून चोरण्याचा मोह होईल किंवा कोणीतरी माझ्या कडून काही चोरेल अगदी तसे जसे आखानाने केले.  आनंदी राहण्यासाठी मला ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या माझ्याकडे आहेत.  येशू ख्रिस्त मला सामाधानी बनवितो.





## पवित्र शास्त्रातून प्रवास करणे (पाठ 2)

त्या नदीमध्ये आपले स्वागत आहे ज्यात आपण बोटीत बसून पवित्र शास्त्रातून प्रवास करणार आहोत! सर्व मिळून आजच्या पाठाचे शिर्षक, ध्येय व पाठांतर वचन म्हणू या.  विदयार्थी पुस्तकं वाटा व त्यांना लपलेले कोडे

सोडविण्यापासून सुरवात करायला लावा. नंतर तुमच्या विद्‌यार्थ्यांना पुस्तकात 2 कृती करायला लावा आणि रंग भरायला सांगा.

## उत्तरं




(मध्यम पुस्तकाचे उत्तरं सोपे व कठिण पुस्तकं वापरून शोधता येतील)

## उष्णकटिबंधीय उपहार गृह (पाठ 2)

### आखाणचे लपविलेला खजिना

साहित्य

- प्लास्टिकचे कप (प्रत्येक विद्‌यार्थ्यासाठी एक)
- प्लास्किटचे लहान चमचे (प्रत्येक विद्‌यार्थासाठी एक)
- चॉकलेट पूडींग मिक्स; (लगेच तयार होणारे किंवा तयार केलेले)
- पूडींग साठी दूध
- प्रत्येक कपच्या खाली लपविण्यासाठी लहान चॉकलेट



कृती

प्रत्येक कपच्या बुडाशी एक किंवा दोन चॉकलेट टाका. पूडींग तयार करण्यासाठी पाकिट दिल्यानुसार कृती करा. पूडिंग थंड झाले की ते कपात टाका व कप सिल करा. ही आखानाच्या तंबूतील माती आहे. तुमचे काम हे राहिल की तुम्ही खोदून जे काही लपलिलेले आहे ते शोधावे.

## दलदलीतील खेळ (पाठ 2)

### 1 . लहान उडया




हया खेळासाठी तुम्हाला प्रत्येक मुलासाठी एक रिकामी बकेट आणि प्लास्टिकचा कप.  प्रत्येक संघाला पूढे तोंड करून उभे राहायला सांगा.  पहिला व्यक्ति त्याचा उजवा हात मागे करून मागच्या मुलाचा वर केलेला उजवा पाय धरेल. दुसरा मुलागा तिस-याचा पाय धरेल असे सर्व करतील.  जर बाहेर खेळले तर पाण्याचाही वापर केला जावू शकतो.  डाव्या हाताने ते सर्व पाण्याने भरलेले कप धरू शकतात.  केवळ एक अपवाद आहे की ओळीतील पहिल्या व्यक्तिच्या हातात कप रहणार नाही.  सुरूवात व शेवटची रेषा आखा.  संकेत मिळाल्याबरोबर पूर्ण ओळ उडया मारत शेवटच्या रेषे पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करेल.  जेव्हा ते शेवटच्या रेषेपर्यंत पोहचतील तेव्हा ते पाणी रिकाम्या बकेटीत टाकतील.  ज्याच्या कडे ज्यास्त पाणी तो संघ विजयी ठरेल.

### 2. प्रत्येक जण बकेटीत

वेळेच्या अधी पाणी व स्ट्रॉ किंवा नळया तयार ठेवा.  प्रत्येक गट जितकं ज्यास्त जवळ उभं राहू शकतो तितकं जवळ उभा राहून गोल तयार करेल.  मधे पाणी ठेवा आणि पूर्ण गट ते पाणी संपे पर्यंत त्या भांडयातून पाणी पिईल.  ते एकत्र किंवा एक एक करून पाणि पिऊ शकतात.  जर तुमचे गट मोठे आहेत तर प्रत्येक संघासाठी एका पेक्षा ज्यास्त पाण्याचे भांडे ठेवा.

## धबाधबा हस्तकला (पाठ 2)

### 3 डी हत्ती




प्रत्येक विद्यार्थ्याला छापील वस्तू दयाः

- 1 हत्तीचे डोके आणि शरीर
- 2 लहान हलणारे डोळे
- शेपटीसाठी 2 सेमी धगा

1. मुलांना हत्तीचे तोंड व शरीराला रंग भरून कापयला लावा.
2. हळूच कसे घडी करावे हे मुलांना दाखवा जेणे करून डोके व पोट चिटकवता येईल.
3. धग्याची शेपूट चिटकवा.
4. डोक्यावर डोळे चिटकवा.
5. डोक वाकवा आणि त्याला माने वरील खचेत टाकून डिंकाने चिटकवा.

## समारोप (पाठ 2)



आपल्याला दुःखी होण्यासाठी मोह येतील, किंवा इतर लोक आपल्याकडून चोरी करतील जसे आखान मोहात पडला व त्याने देवा कडून चोरी केली. आणि बोगलीने हत्तीच्या गेमचा हेवा केला. असेही लोक राहीतील जे त्यांच्या कडील वस्तू दाखवून आपल्याला नाराज करण्याचा प्रयत्न करतील. परंतू आपण हे समजू शकतो की प्रभू येशू ख्रिस्त आपल्याला आतून समाधानी करू शकतो आणि आपल्याला खोल आनंद देऊ शकतो. जेव्हा आपण देवावर भरवसा ठेवू तेव्हा आपल्या जवळ काहीही असले तरी आपण समाधानी राहू. जसे आपले पवित्र शास्त्रातील वचन सांगते की आपण प्रत्येक परिस्थितीत समाधानी असण्याचे गूपित जाणू शकतो, भरपूर जेवण केले असता, किंवा उपाशी असतांना, आपल्याला हव्या असलेल्या गोष्टी आपल्या जवळ असो किंवा नसो. सर्व मिळून आजचा मुख्य मुददा एकत्र म्हणू या........
"आनंदी होण्यासाठी मला जे आवश्यक आहे ते सर्व माझ्याकडे आहे."

"जंगलामधील लढाईत टिकून राहणे" हया व्ही बी एस मध्ये उदया पुन्हा या. इथे आपण पाहू या की जिंकण्यासाठी व टिकूण राहण्यासाठी आवश्यक गुण कोणा मध्ये आहेत.

# पाठ 3

## येशू ख्रिस्त मला दयाळू बनवितो

### मुख्य मुद्दा (पाठ 3)

इतरांनी माझ्या बरोबर जसे वागावे असे मला वाटते तसे मी इतरांबरोबर वागतो.

### पवित्र शास्त्रातील धडा (पाठ 3)

गेहजी गैरफायदा घेतो (1 राजे 5:1-27)

### प्रस्तावना (पाठ 3)

आपण "जंगलामधील लढाईत टिकून राहणे" हयाच्या तिस-या दिवसात परत आलो आहोत, जिथे प्रत्येक संघ जिंकण्याचा मार्ग शोधत आहे. आज तुम्ही कोण आहात हे दाखवून देण्यासाठी बरीच संधी राहील. हे संघ हया संधीचा फायदा घेतील का? दररोज लोक एकमेकांबरोबर दयाळूपणे वागत नाही, प्रत्येक जण जणू आपल्या डोक्यावर पाय ठेवून वर जाण्याचा प्रयत्न करतो ज्यामूळे आपला आत्म विश्वास डळमळू शकतो. परंतू जेव्हा आपण ख्रिस्तमध्ये कोण आहोत हे समजतो तेव्हा आपण आत्मविश्वासू असू शकतो. (आजच्या पवित्र शास्त्रातील वचनाची ओळख करून द्या: लूक 6:31) आज जंगल शाळेमध्ये जात असतांना बोगली मुलांची दादागिरी पाहील, आणि त्याला निर्णय घ्यावा लागेल की तो स्वतःला धोक्यात टाकूनही दयाळूपणे वागू शकतो का! आपण हस्तकलेच्या वेळेस आपल्याला व्ही बी एसची आठवण राहावी म्हणून मजेदार माकड तयार करू, तसेच फराळाच्या वेळेस नाणेही खावू. मग आपण पवित्र शास्त्र उघडू आणि पाहू की गेहजीने स्वतःच्या फायद्यासाठी इतरांचा गैरफायदा कसा घेतला. आजचा मुख्य मुददा एकत्र म्हणू या, इतरांनी माझ्या बरोबर जसे वागावे असे मला वाटते तसे मी इतरांबरोबर वागतो. दिवसाच्या शेवटी तुम्हाला आणि मला आत्माविश्वास असला पाहीजे की आपण हया जंगलामधील जीवनात टिकून राहू, जेव्हा आपल्याला हे माहीत होईल की आपण प्रभू येशू ख्रिस्तामध्ये कोण आहोत तेव्हा आपण इतरांबरोबर दयाळूपणे वागू शकू.

### प्राणी (पाठ 3)

माकड गैरफायदा घेतो आणि वाघ मदत करतो.



### संघ (पाठ 3)

प्रत्येक संघाला शुक्रवारी दाखविण्यासाठी झेंडा किंवा पोस्टर तयार करू दया.

### पवित्र शास्त्रातील वचन (पाठ 3)

"लोकांनी तुमच्याशी जसे वागावे असे तुम्हांला वाटते तसेच तुम्हीही त्यांच्याशी वागा." लुक6:31

## नाटक (पाठ 3)

बोगलीचा गजर वाजतो आणि तो त्याच्या जीपमधून बाहेर उडी मारतो व शाळेसाठी घाई घाईने तयार होतो. त्याचा आवडता नाश्ता खात असतांना बोगली त्याच्या फोनवर यू टयूबवर व्हीडीओ पाहतो की कशा रितीने त्याच्या शाळेतील काही मुलं एका लाहान मुलावर दादागिरी करत आहेत. हे पाहून त्याला दुःख होते परंतू त्याला जंगल शाळेत उशीरा जायचे नसते म्हणून तो शाळेला जातो. रस्त्यात असतांना त्याला व्हीडीओ मधील ते मुल दिसते ज्याला एक माकड त्रास देत असते! माकड त्याच्या पाठिवर बसले आहे, आणि त्याचे जेवण खात आहे, आणि त्याचा गृहपाठ पाहत होते. असे दिसत होते की हे माकड आरामात शाळेला जात आहे, मोफत जेवण खात आहे आणि शाळेत पूढे जाण्यासाठी नक्कल करत आहे. माकड लहान मुलाचा गैर फायदा घेत आहे हे पाहून बोगलीला वाईट वाटते आणि त्याला माहीत होते कि त्याने थांबून मदत केली पाहीजे परंतू त्याला शाळेला उशीरा जायचे नसते. पूर्ण आठवडाभर तो जवळ जवळ उशीराच गेला होता, परंतू देवाने त्याला वेळेवर येण्यासाठी मदत केली. परंतू जर तो आता मदत करण्यासाठी थांबला तर त्याला नक्कीच उशीर होईल. तेव्हा एक सोबती येतो आणि बोगलीला योग्य ते करायला सांगतो. बोगली मकडीची दादागिरी सहन करत असलेल्या लहान मुलाकडे पाहतो आणि मदत करण्याचा निर्णय घेतो. बोगलीने विचार केला, जर माकडाने आपल्यावर दादागिरी केली असती तर? म्हणून बोगली आणि त्याचा सहकारी मुलगा लहान मुलाचे संरक्षण करतात. माकड पळून जात असतांना तो एका झाडाला धडकतो आणि पडतो. तो उठतो आणि पुन्हा त्या झाडाला जाऊन धडकतो, मग तो उठतो आणि पळून जातो. माकड निघून गेल्यावर बोगली मुलाला उठण्यासाठी मदत करतो, आणि मग त्याच्या लक्षात येते की त्याला शाळेला उशीर झाला आहे आणि तो वेळेवर पोहचू शकत नाही!! तेव्हाच वाघ त्यांना पाठीवर घेऊन पोहचवून देईल असे म्हणतो. ते त्याच्या पाठीवर चढतात आणि ते जंगलामध्ये पळून जातात. आणखी एकदा बोगलीला आश्चर्य वाटते की तो वेळेवर शाळेत पोहचला!! मग बोगलीला आठवले की वाटेवर असतांना इतरांनी माझ्याशी जसे वागावे अशी माझी इच्छा आहे तसे इतरांशी वागलो. मग तोंडावर हसू आणून तो म्हणाला, वाह, येशू ख्रिस्त मला दयाळू बनवितो!

## गूहेतील वर्ग (पाठ 3)




### गेहजी गैरफायदा घेतो (1 राजे 5:1-27)

तुम्ही गोष्टीचा प्रत्येक भाग सांगत असतांना मुलांना दाखविलेले चित्र काढू दया. चित्र जितके साधे ठेवता येतील तितके साधे ठेवा म्हणजे मुलांना ते काढणे सोपे जाईल.



1. नामान एक मोठा मनुष्य होता, परंतू त्याला कोड होते. तो बरे होण्यासाठी देवाचा संदेष्टा अलीशा हयाच्या कडे गेला. अलीशाने नामानाला सांगितले की बरे होण्यासाठी त्यांने एक नदी मध्ये जावून 7 वेळेस डुबकी मारावी. नामानाने त्याची आज्ञा पाळली आणि त्याला आनंद झाला की त्याचे कोड बरे झाले! नामानाने अलीशाला भेट वस्तू देण्याची इच्छा दर्शवीली, परंतू त्याने ते घेण्यास नाकार दिला. जरी नामानाने त्याला आग्रह केला तरी अलीशाने बक्षीश घेण्यास नाकार दिला.

चित्र 1: नदी मध्ये नामाचे डोके.

1. अलीशाचा सेवक गेहजी हयाने बरे होणे व भेट वस्तू पाहील्या. नामान निघून गेला व तो घराच्या रस्त्यावर होता, गेहजी त्याच्यामागे धावत गेला. गेहजीला माहीत होते की नामान श्रीमंत असेल आणि तो मोठे नाव असलेला सेनापति होता. त्याने स्वतःसाठी काही पैसे व कपडे घेण्यासाठी नामाना सोबत खोटे बोलायचे ठरविले.



चित्र 2: रस्त्यावर धावणारा गेहजी.



3. काही भेट वस्तू व पैसे मिळविण्यासाठी गेहजी खोटा बोलला. ती वाईट गोष्ट होती परंतू जसे आज लोक करतात तसे ते वाईट करण्यासाठी गेहजीने कारणं शोधले. एक पाप दुस-या पापाकडे जाण्याची साखळी तयार करते आणि पापाची खाली जाणारी शृंखला तयार करते. गेहजीने नामानाला सांगितले की दोन माणसे अलीशाला भेटायला आली होती म्हणून आता त्याचे मन बदलले आहे. नामान खूप आभारी होता की देवाने त्याला बरे केले होते आणि त्याने गेहजीला दुप्पट पैसे दिले. गेहजी लोभी होता आणि त्याला स्वतःसाठी अधिक हवे होते, त्याने अलीशा, नामान आणि देवाचा गैरफायदा घेतला!

चित्र 3: पैशाची एक पिशवी.

4. गेहजीला पैसे व भेटवस्तू मिळाल्यानंतर तो त्या लपविण्यासाठी घाईने घरी गेला. त्याला वाटले की तो ही गोष्ट लपवून ठेवू शकतो आणि अलीशाला कधीच कळणार नाही. परंतू देवाने अलीशाला गेहजीने काय केले ते दाखविले. आपण खात्री बाळगावी की आपण जे काही करतो ते देव पाहतो, आपल्या मनातील हेतू सुध्दा. आपण केलेली चूक योग्य आहे हे दाखविण्यासाठी तयार केलेल्या काहाणीने तो मूर्ख ठरणार नाही.



चित्र 4: एक घर



5. आता सर्वांना कळले होते की गैरफायदा घेण्यासाठी गेहजीने काय केले! मग देवाने नामानाचे कोड गेहजीला देवून त्याला शिक्षा दिली. नामान किंवा अलीशाने त्याच्याशी जसे वागले पाहीजे अशी गेहजीची इच्छा होती तसा तो त्यांच्याशी वागला नाही. तुम्ही अलीशा सारखे इतरांशी दयाळूपणे वागाल का? की तुम्ही गेहजी सारखे व्हाल जे स्वतःसाठी अधिक मिळवू इच्छितात आणि इतरांचा गैरफायदा घेतात.

## मतं

दोन पर्याय वर्गासमोर वाचून दाखवा. मतांची कल्पना ही आहे की तुमच्या विद्यार्थ्यांना विचार करायला लावावा, म्हणून दोन्ही बाजू बरोबर असे तुम्ही भासविले पाहीजे. दिलेले दोन पर्याय वाचा आणि ते दोन्ही बरोबर आहे असे दर्शवा. पहिजे तर तुम्ही मत मांडण्यासाठी स्टीकरचाही उपयोग करू शकता. त्यांना योग्य उत्तर दिसणार नाही असा प्रयत्न करा, परंतू त्यांना स्वतः विचार करण्यासाठी प्रोत्साहन दया.

**प्रश्नः गेहजीने नामानाकडे जाऊन पैसे मागणे योग्य होते का?**

अ. देवाने नामानाला आरोग्य दिले म्हणून अलीशाने त्याच्या कडून काहीही न घेण्याची जी निवड केली त्यात अलीशाचा सेवक हया नात्याने गेहजीने हस्ताक्षेप करणे चूकीचे होते. त्याने नामानाच्या मागे जायला नको होते.

ब. जेव्हा सेवा दिली जाते तेव्हा पैश्याची अपेक्षा करणे साहाजिक आहे. तसेच जसे तुम्हाला बरे करणारा डॉक्टर, नामान बरा झाला होता म्हणून त्याला पैसे मागणे योग्य होते.


जसे गेहजीने नामानाचा गैर फायदा घेतला तसेच लोक सुध्दा तुमचा गैर फायदा घेतील. परंतू आपण हे शिकू शकतो की, इतरांनी माझ्या बरोबर जसे वागावे असे मला वाटते तसे मी इतरांबरोबर वागतो.; येशू ख्रिस्त मला दयाळू बनवितो.





## पवित्र शास्त्रातून प्रवास करणे (पाठ 3)

त्यानदीमध्ये आपले स्वागत आहे ज्यात आपण बोटीत बसून पवित्र शास्त्रातून प्रवास करणार आहोत! आजच्या धडयाचे शिर्षक, मुख्य मुददा व पाठांतर वचन एकत्र म्हणू या. विदयार्थी पुस्तकं वाटा व त्यांना लपलेले कोडे सोडविण्यापासून सुरवात करायला लावा. नंतर तुमच्या विद्यार्थ्यांना पुस्तकात 2 कृती करायला लावा आणि रंग भरायला सांगा.

## उत्तर




(मध्यम पुस्तकाचे उत्तरं सोपे व कठिण पुस्तकं वापरून शोधता येतील)

### उष्णकटिबंधीय उपहार गृह (पाठ 3)


#### गेहजीच्या नाण्याचा ढिग

साहित्यः

- गोल आकाराचा पदार्थ, बिस्कीट
- प्रत्येक विद्यार्थ्यासाठी एक कागदी रूमाल

कृतीः

- फराळाला नाण्याच्या ढिगासारखं एकावर एक रचा.
- मग अशी नक्कल करा की एवढं ज्यास्त आहे तर मग गेहजी त्यातून थोडं घेत आहे.
- प्रत्येक मुलांला बिस्कीटचे नाणे व कागदी रूमाल दया.



## दलदलीतील खेळ (पाठ 3)

### 1. दलदल पार करणे




जमीनीवर टायर किंवा काही गोल ठेवून दलदल तयार करा. त्यात वेगवेगळया जागेवर नकली मगर ठेवा. दलदलीच्या सुरवातीला व शेवटी सुरूवात व शेवट असे चिन्ह लावा. सुरवात करण्याआधी मुलांमध्ये उत्तेजन निर्माण करा आणि जिंकणा-या संघाचे अभिनंदन करा. आणखी एक पर्याय हा असू शकतो की लहान मुलांनी गटातील जखमी मुलांना दलदलीतून न्यावे. मुलांच्या सुरक्षिततेची खात्री करा.

### 2. कोळीचे जाळे पार करणे

चार फूट दूर अशा एकापूढे एक खुर्च्या ठेवा. एका खूर्चीच्या समोरच्या पाया पासून दुस-या खूर्चीच्या पूढच्या पायापर्यंत जमीनीपासून सहा फूट वर दोरी बांधा. कोळीचे जाळे तयार करण्यासाठी खूर्चीच्या तीन चार जोडयांचा वापर करा, दोर एकमेकांना क्रॉस झाल्या पाहीजे. मुलांच्या कुवतीनुसार कोळयाचे जाळे सोपे किंवा कठिण असे तयार करा. कोळयाच्या जाळीत सुरवात व शेवटची खून लावा. मुलांमध्ये उत्साह निर्माण करा व शर्यत सुरू करा. मुलांनी दो-यांना स्पर्श न करता जाळे पार केले पाहीजे. जिंकणा-या गटाला गुण मिळेल.

## धबधबा हस्तकला (पाठ 3)

### माकड दार लटकन




प्रत्येक मुलाला खालील प्रमाणे छापील साहित्य दयाः

- एक दार लटकनाचा साचा किंवा बेस, माकडाचे शरीर आणि 2 पाय
- 5 पाईप क्लीनर 10 सेमी किंवा इंच

1. मुलांना रंग भरून लटकन, माकड व त्याचे पाय कापायला सांगा.



2. पाईप क्लीनर कसे वाकवावे ते दाखवा आणि पाय चिटकावा.
3. पाय कसे मुडपायचे ते दाखवा व शरीराला चिटकवा.
4. माकडाला पाय लावा.
5. हात मुडपा व ते माकड व लटकनाला लावा, असे की जिथे हात लिहिले आहे तिथे ते चिटकवा.

## समारोप (पाठ 3)

लोक गेहजी व आजच्या माकडा सारखे आपला गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करतील. परंतू आपण जगाच्या मार्गाने चालू नये, आपण वेगळे राहू शकतो व येशूच्या मागे जावू शकतो. इतर लोकं कसे वागतात हे महत्वाचे नाही, मी दयाळूपणे वागण्याचा निर्णय घेवू शकतो, आणि जसे आजचे पवित्र शास्त्र वचन सांगते तसे इतरांनी माझ्या बरोबर जसे वागावे असे मला वाटते तसे वागू शकतो.

## पाठ 4

### येशू ख्रिस्त मला त्याच्या कुटुंबाचा भाग बनवितो

### मुख्य मुद्दा (पाठ 4)

देवाचे मुल हया नात्याने मला स्वर्गात सार्वकालिक जीवन आहे.

### पवित्र शास्त्रातील धडा (पाठ 4)

हामानाचा प्रत्यक्ष हल्ला (एस्तेर)

### प्रस्तावना (पाठ 4)

पुन्हा एकदा स्वागत! आपण “जंगलामधील लढाईत टिकून राहणे” हयाच्या शेवटास पोहचलो आहोत. जे संघ आहेत ते आता पूर्ण जोर लावतील का? हया आठवडी आपल्या संघानी आयुष्य भर चालणा-या साहसाची सुरवात केली, परंतू त्यांना कल्पना नव्हती की ते किती आनंदायी राहणार आहे. ते आता संपत आहे परंतू मला वाटत की आजचा दिवस सर्वश्रेष्ठ असेल.

हया आठवडी आपण येशू ख्रिस्तमध्ये कोण आहोत ते शिकत आहोत आजचा दिवस विशेष आहे. आज आपण पाहू की आपण देवाच्या कुटुंबामध्ये दत्तक घेतलेले आहेत! येशू ख्रिस्त मला त्याच्या कुटुंबाचा भाग बनवितो. (आजच्या पवित्र शास्त्रातील वचनाची ओळख करून द्या: योहान 10:27-28) बोगलीच्या साहसामध्ये त्याच्या वर हल्ला होतो आणि तो निश्चितच त्याच्यात बचावतो. नंतर आपण आपले पवित्र शास्त्र उघडू आणि पाहू की कशा रितीने एस्तेर देवाच्या कृपे व दयेने नामानाच्या प्रत्यक्ष हल्याविरूध्द जिंकली. आपल्या हस्त कलेत आपण घरी घेऊन जाण्यासाठी फोटो फ्रेम तयार करणार आहोत आणि फराळाच्या वेळेस आपण एस्तेरचा मुगुट तयार करू! आपण देवाचे मुल आहोत हे जाणून एस्तेर आनंदी होती. आजचा मुख्य मुददा सर्व मिळून म्हणू या, देवाचे मुल हया नात्याने मला स्वर्गात सार्वकालिक जीवन आहे. दिवसाच्या शेवटी तुम्ही खात्री बाळगली पाहिजे की तुम्ही जीवनाच्या जंगलामध्ये जिवंत टिकून राहाल आणि आपल्याला सुध्दा देवाच्या कुटुंबाचा भाग होण्याची संधी आहे!

### प्राणी (पाठ 4)

वाघ हल्ला करतो आणि कोल्हा मदत करतो.



## संघ (पाठ 4)

प्रत्येक संघाला उदयाच्या कार्यक्रमाची तयारी करू द्या. त्यात प्रोत्साहन, झेंडा आणि प्रेक्षकांसाठी अभिवादन असावे.

## पवित्र शास्त्रातील वचन (पाठ 4)

"माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात.आणि ती माझ्यामागे येतात .मी त्यांना ओळखतो . मी माझ्या मेंढरांना अनंतकाळचे जीवन देतो आणि त्यांना .ती कधीच मरणार नाहीत .कोणीच माझ्या हातून हिरावून घेणार नाही." योहान 10:27-28

## नाटक (पाठ 4)

पुन्हा एकदा बोगलीचा गजर वाजतो आणि तो हळूच उठून बसतो आणि जागा होतो. त्याच्या लक्षात येते की तो ओला झाला आहे कारण पाऊस आलेला असतो. अरे! त्याने रात्री झोपण्याआधी जीप झाकायला हवी होती! त्याचा आवडा नाश्ता संपविल्यानंतर तो रेन कोट घालतो आणि जंगलातील त्याच्या शाळेला जायला निघतो. त्याच्या नेहमीच्या रस्त्याने गेला तर तो शाळेत पोहचे पर्यंत भिजून जाईल म्हणून तो इतर मुलांबरोबर बोलला की थोडया दाट जंगलातून जावे जेणे करून तो कोरडा राहिल. फक्त एक समस्या होती की त्या रस्त्याने वाघ होते! त्याने त्याचा फोन हातात घेतला आणि पाहिले. फेसबुकवर आज सकाळी वाघानी दाट जंगलामधले त्यांचे फोटो टाकले होते. तरी सुध्दा बोगलीने त्या रस्त्याने जाण्याचे ठरविले. बोगली दाट जंगलामध्ये वाघाच्या क्षेत्रात गेल्यावर त्याच्या लक्षात आले की त्याच्या अंगावर पटटे नसल्यामूळे तो लवकर दिसून पडतो. तेव्हाच वाघाने उडी मारली व तो बोगलीवर गुरगुरला. वाघाचा सरळ सरळ हल्ला त्याला घाबरवितो, बोगली ने लगेच थोडा चिख्खल घेतला व अंगावर पटटया काढल्या. आता त्याला वाटले की तो स्पष्ट दिसणार नाही. लवकरच कोल्हा कोप-यातून आला व त्याने अंगावर पटटया असलेल्या बोगलीला पाहीले! तो म्हणाला, बोगली तू एकटा आहेस असे समजू नको. तुझया अंगावर वाघासारख्या पटटया नाहीत हयाने काही फरक पडत नाही. तुला वाघांचा हिस्सा होण्याची गरज नाही कारण येशू ख्रिस्त तुला त्याच्या कुटंबाचा भाग बनवितो. बोगलीने अंगावरच्या पटटया डबक्यातल्या पाण्याने धुतल्या आणि तो व कोल्हा वाघापासून दूर जातात. तेव्हा बोगलीचा पाय फसतो आणि तो पाय काढू शकत नाही. ते तो काढण्याचा प्रयत्न करतात आणि मग तो काढतात. ते पायी चालत जंगलाच्या शाळेत पोहचल्यावर कोल्हा बोगलीला येशू ख्रिस्ता बददल सांगतो की त्याने बोगलीच्या चूकीच्या कृत्यासाठी कशी भरपाई केली. ते चालत असतांना कोल्हा तारण समजावितो आणि बोगली प्रार्थना करतो, मग तो म्हणतो, देवाचे मुल हया नात्याने मला स्वर्गात सार्वकालिक जीवन आहे! येशू ख्रिस्त मला त्याच्या कुटुंबाचा भाग बनवितो. आणखी एकदा बोगली वेळेवर शाळेत पोहचतो.

## गुहेतील वर्ग (पाठ 4)

### हामानाचा प्रत्यक्ष हल्ला ; एस्तेर





तुम्ही गोष्टीचा प्रत्येक भाग सांगत असतांना मुलांना दाखविलेले चित्र काढू दया. चित्र जितके साधे ठेवता येतील तितके साधे ठेवा म्हणजे मुलांना ते काढणे सोपे जाईल.




1. अहश्वरोश राजाची आज्ञा न पाळल्यामूळे वश्ती राणीला तीच्या पदावरून काढण्यात आले. एस्तरला तिच्या जागी निवडण्यात आले. ति केवळ 14 वर्षाची होती व राज्यातील सर्वात खालच्या जातीची होती.

चित्र 1: सुंदर राजकुमारी असे एस्तेरचे चित्र काढा



2. हामान राजाचा पदाधिकारी होतो, संपूर्ण राज्यात हो राजाच्या खालोखाल पदावर होता. त्याला स्वतःचा खूप गर्व होता आणि राजानी फर्मान काढले की तो दिसताच लोकांनी त्याला मुजरा करावा. मर्दखय यहूदी होता व तो देवा शिवाय इतर कोणाच समोर झुकत नसे, हामानापूढेही नाही. हया मूळे हामानाला फार राग आला. तो इतका रागावला की त्याने केवळ मर्दखयाला मारण्याचा निर्णय घेतला नाही तर त्याने सर्व यहूदी लोकांनाही मारण्याचा निर्णय घेतला. त्याने राजाला चातुर्याने सर्व यहूदी लोकांना मारण्याचे फार्मान काढण्यासाठी तयार केले.

चित्र 2: जमीनीवर घुडघे टेकलेले लोक.



3. त्याच प्रकारे देवाने आपल्याला 10 आज्ञा किंवा नियम पाळण्यासाठी दिले. जर आपण त्या 10 आज्ञा पाळत नाही तर आपण स्वतःवर शिक्षा ओढावून घेतो. तुम्ही आणि मी नेहमीच त्या आज्ञा पाळण्यासाठी असमर्थ राहू.

चित्र 3: नियमांचे पोस्टर लागलेला खांब.



4. एस्तेरने राजा साठी तीने विशेष मेजवानी ठेवली आणि तिला व सर्व यहूदी लोकांना असलेल्या धोक्या बददल सांगितले. एस्तेर जेव्हा बोलली तेव्हा तिला

मरण्याचा धोका होता परंतू तिच्या शौर्याने ती तिच्या लोकांना मरण्यापासून वचवू शकली. येशू ख्रिस्ताने मध्यस्ती केली आणि आपल्याला आपल्या पापांची क्षमा व्हावी असे केले. तो आपल्यासाठी आणि जे सर्व आज्ञा पाळत नाहीत त्यांच्यासाठी मरण पावला.

चित्र 4: विशेष जेवण असलेला मेज किंवा टेबल.

5. एस्तेर प्रमाणेच जर तुम्हाला वाचण्याची इच्छा असेल तर देव जो खरा राजा त्याला तुम्ही तुमच्यावर असलेल्या धोक्या बददल सांगितले पाहिजे. तुम्ही माझ्या मागे प्रार्थनेचे शब्द म्हणू शकता किंवा तुमच्या शब्दात त्याला सांगू शकता.



चित्र 5: ख्रिस्ती कुटुंबाच्या सोबतचे तुमचे चित्र काढा.

“प्रिय देवा, मला माहीत आहे की मी पापी आहे. मला माहीत आहे की तु येशूला माझा तारणारा होण्यासाठी पाठविले. तो माझ्या पापांची शिक्षा भोगण्यासाठी वधस्तंभावर मेला. कृपा करून मला क्षमा करा आणि माझ्या जीवनामध्ये ये आणि मला बदल. माझ्या उर्रवरित जीवनात तुझे अनुसरण करण्यासाठी माझे मार्गदर्शन कर. माझे तारण करून मला तुझ्या कुटुंबाचा भाग बनविल्या बद्दल तुझे आभार मानतो. मी मरण पावल्यावर तुझया बरोबर स्वर्गात राहण्यासाठी मला घेतल्या बददल तुझे आभार मानतो. येशूच्या नावाने आमेन”.

## मतं

दोन पर्याय वर्गासमोर वाचून दाखवा. मतांची कल्पना ही आहे की तुमच्या विद्यार्थ्यांना विचार करायला लावावा, म्हणून दोन्ही बाजू बरोबर असे तुम्ही भासविले पाहीजे. दिलेले दोन पर्याय वाचा आणि ते दोन्ही बरोबर आहे असे दर्शवा. पाहिजे तर तुम्ही मत मांडण्यासाठी स्टीकरचाही उपयोग करू शकता. त्यांना योग्य उत्तर दिसणार नाही असा प्रयत्न करा, परंतू त्यांना स्वतः विचार करण्यासाठी प्रोत्साहन दया.

**प्रश्नः एस्तेरने योग्य ते केले कि अयोग्य ते केले?**

अ. देशाच्या पुढा-याकडे जावून नियमांमध्ये बदल करून घेणे चांगले आहे. कोणत्याही प्रकारे मर्जी संपादन करणे योग्य आहे, जसे एस्तेरने जेवण देऊन केले.

ब. नियमांचा स्विकार करून काहीही परिणाम झाला तरी त्यानुसार जगणे हे चांगले आहे. जेवण देऊन मर्जी संपादन करणे आणि मग नियमांमध्ये बदल करून घेणे अयोग्य आहे.

आपल्या जीवनात आपल्यावर प्रत्यक्ष हल्ले होतील. परंतू आपण खात्री बाळगावी की हे हल्ले आपल्याला सार्वकालिक रित्या हानी करू शकत नाहीत कारण देवाची मुले हया नात्याने आपल्याला स्वर्गात


सार्वकालिक जीवन आहे.  ‘देवाचे मुल हया नात्याने मला स्वर्गात सार्वकालिक जीवन आहे.!’ येशू ख्रिस्त मला त्याच्या कुटुंबाचा भाग बनवितो.




## पवित्र शास्त्रातून प्रवास करणे (पाठ 4)

त्यानदीमध्ये आपले स्वागत आहे ज्यात आपण बोटीत बसून पवित्र शास्त्रातून प्रवास करणार आहोत! आजच्या धडयाचे शिर्षक, मुख्य मुददा व पाठांतर वचन एकत्र म्हणू या.  विदयार्थी पुस्तकं वाटा व त्यांना लपलेले कोडे सोडविण्यापासून सुरवात करायला लावा.  नंतर तुमच्या विद्यार्थ्यांना पुस्तकात 2 कृती करायला लावा आणि रंग भरायला सांगा.

## उत्तरं




(मध्यम पुस्तकाचे उत्तरं सोपे व कठिण पुस्तकं वापरून शोधता येतील)

## उष्णकटिबंधीय उपहार गृह (पाठ 4)




### एस्तेरचा मुकुट

पर्याय 1:

साहित्यः

- कागदाचे कप
- कप भरण्यासाठी फराळः चिप्स्, चिटोझ, फळ, बिस्कीट

कृतीः

- कपांना मुकुटाचा आकार देण्यासाठी वरून त्रिकोन कापा.
- कल्पनाः मुलांना त्याच्या कपांना रंग भरून त्यात फराळ टाकू दया.



पर्याय 2: मुकुटाच्या आकारात कापलेले टरबूज.

साहित्यः

- मुलांसाठी वयैक्तिक ताटं
- तयार केलेले फळः जे स्थानिक रित्या उपलब्ध आहेत ते.
- कल्पनाः टरबूज, खरबूज, केळी, द्राक्ष, नाश्पती, स्ट्रॉबेरी, अननस.

कृतीः

- टरबूज कापा व त्याला आतून पोकळ करा, व काढलेला भाग फराळाचा भाग म्हणून वापरा. त्यानंतर बाहेरून टरबूजाचा थोडा भाग कापा जेणे करून ते उभे करण्यासाठी मदत होईल.
- पोकळ केलेल्या टरबूजाच्या सालामध्ये तुमच्या आवडीचे फळ भरा.

## दलदलीतील खेळ (पाठ 4)




### 1. गुहा पार करणे

हया खेळा साठी तुम्हाला मोठया प्लास्टिकच्या पिशव्या किंवा वर्तमान पत्र आणि चिकटपटटी लागेल. जितकी लांब शर्यत तुम्हाला घ्यायची आहे तितके लांब हया पिशव्या एकमेकांना जोडून बोगदा तयार करा. जितके संघ आहेत तितके बोगदे तयार करा.

प्रत्येक संघ बोगदयात जाईल आणि शेवट पर्यत जाईल. जो संघ सर्वात आधी बोगदयाच्या बाहेर येईल तो विजयी होईल.

हयाला आणखी मजेदार बनविण्यासाठी कागदाचे दगडं किंवा झाडं बोगदयाच्या आत अडखळणं म्हणून तयार करा.

### 1. शर्यत लावू या

प्रत्येक मुलाला कोणत्याही झाडाचे पान आणि स्ट्रॉ लागेल, प्रत्येक संघासाठी जिथे त्यांचे पान पडेल तो भाग आखून दया, प्रत्येक संघाला माहित असावे की त्यांना किती पानं मिळतील. जेव्हा तुम्ही सुरवात करा हे ऐकाल तेव्हा पूर्ण गट त्यांचे पानं आकाशाकडे फेकतील आणि स्ट्रॉ च्या मदतीने ते हालवून अंतीम रेषेकडे नेण्याचा प्रयत्न करतील. बरेच पानं विरूध्द संघाकडे जातील, म्हणून मुलांनी हे निश्चीत करावे की पानं त्यांच्याच भागात पडतील. ज्यांच्या भागात ज्यास्त पान राहतील ते विजयी ठरतील, जरी ते पानं दुस-या संघाचे असले तरी.




## धबधबा हस्तकला (पाठ 4)

### वाघाच्या चित्राची फ्रेम



प्रत्येक मुलाला खालील गोष्टी छापून दयाः

1 वाघाच्या डोक्याच्या आकाराची फ्रेम

2 दातांचे जोड

2 डोळे

मुलांना वाघाचे डोके कापून त्याला रंग भरायला सांगा. हलणारे लहान डोळे योग्य जागेवर चिटकवा. शेवटी, वाघाच्या डोक्याच्या मागच्या बाजूला दात चिटकवण्यात येतील. जर घेता आले तर फोटो काढा आणि ते चित्र वाघाच्या तोंडात ठेवा!

समारोप 4

जीवन म्हटलेल्या जंगलामध्ये लोक आपल्यावर हल्ला करतील, जसे हामानाने एस्तेरवर केला तसे. परंतू जेव्हा आपण देवाच्या कुटुंबाचा भाग आहोत तेव्हा आपल्याला घाबरण्याचे कारण नाही. जेव्हा इतर तुमच्या बाजूने असण्याचा खोटा आव आणतील तेव्हा येशू नेहमी तुमच्या बरोबर असेल. वास्तविक तुम्हा पैकी जिक्यांनी आज प्रार्थना केली तितकी खात्री बाळगू शकतात की जेव्हा आपण प्रार्थना करून येशूला आपल्या अंतकरणात बोलावितो तितके आपण त्याच्या कुटुंबाचा भाग बनतो. आणि जसे आपले पवित्र

शास्त्रातील वचन सांगते आपण देवाचे आहोत आणि कोणीही ते आपल्या कडून हिरावून घेवू शकत नाही. आजचा मुख्य मुद्दा सर्व मिळून म्हणू या.. 'देवाचे मुल हया नात्याने मला स्वर्गात सार्वकालिक जीवन आहे.' "जंगलामधील लढाईत टिकून राहणे" हया व्ही बी एस च्या आणखी एक रोमांचक दिवसासाठी उद्या परत या आणि पहा की कोणत्या संघाकडे खेळण्याचे, टिकून राहण्याचे व जिंकण्याचे कौशल्य आहे!

## पाठ 5

### येशू ख्रिस्त मला धैर्यावान बनवितो

### मुख्य मुद्दा (पाठ 5)

गोष्टी अशक्य वाटत असल्या तरी मी भितीवर विजय मिळवू शकतो.

### पवित्र शास्त्रातील धडा (पाठ 5)

गल्याथ धमकावितो (1 शमुवेल 17)

### प्रस्तावना (पाठ 5)


“जंगलामधील लढाईत टिकून राहणे” हया कार्यक्रमाच्या शेवटच्या वेळेत आपण थेट प्रक्षेपण करत आहोत. इथे असलेले सर्व जण, बोगली, प्राणी आणि सर्व संघाचे प्रतिनिधी. आपण हया कार्यक्रमाच्या शेवटासाठी परत आलो आहोत आणि हे महत्वाचे आहे. काय तुमच्याकडे जे आवश्यक ते कौशल्य आहे का? मजेसाठी आमच्या बरोबर जुळा, ट्विटर वर आम्ही हॅशटैग जंगलामधील जीवन हयात उपलब्ध आहोत आणि आम्हाला तुमचे मत कळवा. आजच्या दिवशी मजा येणार आहे. तुम्ही आणि मी दररोज भितीचा सामना करत असतो परंतू येशू ख्रिस्ता बरोबर आपण अशक्य वाटत असले तरी त्यावर विजय मिळवू शकतो. (आजच्या दिवसाच्या पवित्र शास्त्रातील वचनाची ओळख करून द्या: यहोशवा 1:9) चला घाई करू आणि आजच्या दिवसाची सुरवात करू, म्हणजे आपण बोगलीला भेटू आणि दावीद आणि गल्याथाबद्दल शिकू, काही मजेदार फराळ खावू, हस्तकला करू आणि खेळही खेळू. सर्व मिळून आजचा मुख्य मुद्दा म्हणू या, ‘गोष्टी अशक्य वाटत असल्या तरी मी भितीवर विजय मिळवू शकतो.’ आजच्या दिवसाच्या शेवटी तुम्ही आणि मी खात्री बाळगू शकतो की आपण जीवन म्हटलेल्या जंगलामधील लढाईत टिकून राहू आणि आपल्याला माहीत आहे की प्रभू येशू ख्रिस्तामध्ये आपण धैर्यवान आहोत!

### प्राणी (पाठ 5)

मगर घाबरविते आणि उंदीर मदत करतो.

### संघ (पाठ 5)

प्रत्येक संघ पूढे येवून त्यांचा झेंडा आणि सर्व गटासाठी अभिवादन प्रस्तूत करू शकतो. कोणता संघ सर्वात उत्तम आहे ते पहा व विजेता घोषित करा.



## पवित्र शास्त्रातील वचन (पाठ 5)

*“खंबीर आणि निर्भय राहण्याची मी तुला आज्ञा केली आहे ना? तेव्हा कचरू नकोसपरमेश्वर तू जेथे जाशील . .तेथे तुझ्या बरोबर आहे”* *यहोशवा* 1:9

## नाटक (पाठ 5)

पुन्हा एकदा बोगलीचा गजर वाजतो, बोगली जीप मध्ये झोपलेला आणि तो कूरकूर करतो आणि गजर बंद करतो. मग त्याचा फोन वाजतो आणि तो जागा होऊन जीपच्या बाहेर येतो. त्याचा मित्र उंदीर फोनवर बोलत असतो आणि त्याला विचारतो की तो येवून त्याला जंगल शाळेत जायला मदत करील का. बोगली तयार होतो परंतू उंदीराला घ्यायला जाण्या आधी त्याने घाई करून त्याचा आवडता नाश्ता खाल्ला पाहीजे. जर त्याने तसे केले नाही तर ते दोघांनाही शाळेसाठी उशीर होईल. जेव्हा बोगली पोहचतो तेव्हा, उंदीराकडे मिठाई असते आणि तो ती बोगलीच्या तोंडावर फेकून त्याला चकीत करतो! ते दोघे हसतात आणि बोगलीचे तोंड स्वच्छ करतात, मग ते गाणे गात चालू लागतात आणि जेव्हा ते दलदलीकडे पोहचतात तेव्हा ते म्हणतात आपण ही दलदल कशी पार करू?? त्यांना दलदलीच्या कडेला लहान बोट दिसते आणि ते त्यात चढतात आणि पायडल मारू लागतात. मग अचानक त्याला गुरगुरण्याचा आवाज येतो, तो कोणता प्राणी आहे हे पाहण्यासाठी ते आजू बाजूला पाहू लागतात. उंदीराला आधी दिसते.... ते मगर होते! उंदीर बोगलीला धैर्यवान होण्यास सांगतो. मगर त्यांचा पाठलाग करू लागते आणि ते शक्य होईल तितक्या जोरात पायडल मारतात. आणि ते दोघेही एकत्र ओरडतात की मला खूप भिती वाटत आहे! मगर जवळ जवळ येतो आणि बोगलीच्या लक्षात येते की मगर येवून त्याला पकडण्याआधी दुस-या कडेला जाणे अशक्य आहे. बोगली पूर्ण पणे विसरला आहे की त्याला शाळेला जाण्यासाठी उशीर होणार आहे आणि तो चिंता करतो की तो आता मगराचे अन्न होणार आहे. उंदीर बोगलीला धैर्य धरायला सांगतो परंतू बोगली त्याच्या ओरडण्याच्या आवाजाने काही ऐकू शकत नाही. मग बोगलीला त्याचा मित्र अस्वल हयाची आठवण झाली! त्याने त्याचा फोन हातात घेतला आणि अस्वलाला पटकन संदेश पाठविला. मगर अधिकाधिक जवळ येत होते आणि तो बोट तोडांत घेण्यासाठी त्याचे तोंड बंद करणार एवढयात अस्वल किना-यावर आले आणि इतक्या जोरात ओरडले की पूर्ण दलदल हालली! मगर घाबरले आणि पोहत परत गेले. सर्व जण मोठयाने ओरडू लागतात कारण जे अशक्य ते झाले होते! बोगली ओरडतो गोष्टी अशक्य वाटत असल्या तरी मी भितीवर विजय मिळवू शकतो!!! येशू ख्रिस्त मला धैर्यवान बनवितो!’ एकदा सुरक्षित दुस-या बाजूला गेल्यावर ते पटकन एक सेल्फी काढतात आणि घाईने शाळेला जातात. बोगलीला वाटले होते की हया वेळेस नक्कीच उशीर झाला आहे, परंतू ते घंटा वाजविण्याआधीच पोहचले. आणखी अशक्य गोष्टी होत होत्या! बोगली त्याच्या कमजोरीतही हया आठवडयात दर रोज वेळेवर शाळेत पोहचला होता. गोष्टी अशक्य वाटत असल्या तरी मी माझ्या भितीवर विजय मिळवू शकतो. येशू ख्रिस्त मला धैर्यवान बनवितो! त्या दिवशी त्याच्या जीप मध्ये झोपण्याआधी त्याने आनंद साजरा केला.

## गूहेतील वर्ग (पाठ 5)

### गल्याथ धमकावितो (1 शमुवेल 17)




तुम्ही गोष्टीचा प्रत्येक भाग सांगत असतांना मुलांना दाखविलेले चित्र काढू द्या. चित्र जितके साधे ठेवता येतील तितके साधे ठेवा म्हणजे मुलांना ते काढणे सोपे जाईल.



1. दावीद एक लहान मुलगा होता व त्याला 7 मोठे भाऊ होते. त्याच्या वडिलांनी त्याला मेंढरांची जवाबदारी दिली. एक दिवस त्याच्या वडिलांनी त्याला युध्द भूमिवर जायला लावले, त्याच्या तीन भावासाठी जे शौलाच्या सैन्यात होते त्यांच्यासाठी जेवण व सेनापतिसाठी 10 प्रकारच्या चीज बक्षीस म्हणून घेऊन.

चित्र 1: चिज, जेवण आणि ब्रेड भरलेली पिशवी.



2. गल्याथ खूप धिप्पाड माणूस होता; 3 मिटर, 9 फूट 9 इंच आणि पलिशिष्टी सैन्याचा विजेता होता. तो ओरडून इस्त्राएली सेनेला शिव्या शाप देऊन घाबरवित होता. दोन सैन्यांनी एकमेकांबरोबर लढाई करून अनेक लोक मारण्याएवजी पलिष्टी सैन्याने त्यांनी कोण एकाने, एक मनुष्य गल्याथ हयाच्या बरोबर लढावे असा प्रस्ताव मांडला. जो जिंकेल तो त्या लढाईचे संपूर्ण राष्ट्र जिंकेल.

चित्र 2: घाबरलेला शिपाई



3. त्याच्या वडीलांनी पाठविलेल्या वस्तू पोहचवून देत असतांना दावीदाने गल्याथाचे ओरडणे आणि धमक्या ऐकल्या. दावीद गल्याथाला घाबरत नव्हता कारण त्याला माहीत होते की देव इस्त्राएलाच्या बाजूचा आहे. दावीदाने घोषणा केली की तो गल्याथा विरूध्द लढणारा शिपाई बनेल. जेव्हा शौलाने दावीदाच्या धैर्यवान प्रस्वाबद्दल ऐकले तेव्हा त्याने दावीदाला बोलाविले. त्याने दावीदाला म्हटले की गल्याथापूढे जिंकण्यासाठी तो अतिशय लहान आहे. त्याने असे ही म्हटले की गल्याथ प्रशिक्षित योध्दा आहे आणि दावीद त्याच्या पूढे अप्रशिक्षित आहे.

चित्र 3: शौल राजा




4. दावीदाला हे सिध्द करावे लागले की तो शूर आहे. त्याने त्याला सांगितले की कशा रितीने त्याने अस्वल व सिंहाला मारले कारण त्यांनी

त्याच्या कळपातील मेंढरे चोरण्याचा प्रयत्न केला.  परंतू खात्री पटविणारे सर्वात महत्वाचे वाक्य हे होते की, "ज्या देवाने मला सिंहाच्या व अस्वलाच्या पंजातून सोडविले तो मला हया पलिष्टयाच्या हातूनही सोडविल"  जरी अशक्य वाटत असले तरी त्याला खात्री होती कारण देव त्याच्या बाजूने होता.  देवा आपल्या बरोबर आहे म्हणून आपण अशक्य परिस्थितीचा सामना करू शकतो आणि धैर्य धरू शकतो.

चित्र 4: एक सिंह आणि अस्वल

5. शौला राजाने दावीदावर विश्वास ठेवून संपूर्ण इस्त्राएल राष्ट्रासाठी लढण्याचे ठरविले.  त्याने दावीदाला सर्वात उत्तम शस्त्र, शिरस्त्राण आणि तलवार दिली. ते इतके भारी होते की दावीद ते घालून चालू सुध्दा शकत नव्हता.  त्याने हे सर्व न वापरून मेंढरे राखतांना जे तो वापरत होता ते वापरण्याचा निर्णय घेतला.  त्याला माहित होते की जर तो जिंकला तर ते देवाकडून असेल, त्याच्या शक्तिने, कौशल्याने किंवा लढाईच्या शस्त्रांनी नव्हे.  त्याने त्याच्या गोफणीसाठी 5 दगडं निवडले आणि गल्याथाबरोबर लढण्यासाठी गेला.  त्याचा पहिलाच दगड गल्याथाच्या कपाळावर जाऊन लागला आणि तो मरण पावला.  दावीद धैर्यवान होता कारण त्याला माहीत होते की देवाबरोबर सर्व गोष्टी शक्य आहेत!



चित्र 5: गोफण आणि पाच चिकने दगडं

## मतं

दोन पर्याय वर्गासमोर वाचून दाखवा.  मतांची कल्पना ही आहे की तुमच्या विद्यार्थ्यांना विचार करायला लावावा, म्हणून दोन्ही बाजू बरोबर असे तुम्ही भासविले पाहीजे.  दिलेले दोन पर्याय वाचा आणि ते दोन्ही बरोबर आहे असे दर्शवा.  पाहिजे तर तुम्ही मत मांडण्यासाठी स्टीकरचाही उपयोग करू शकता.  त्यांना योग्य उत्तर दिसणार नाही असा प्रयत्न करा, परंतू त्यांना स्वतः विचार करण्यासाठी प्रोत्साहन दया.

**प्रश्नः  दावीदाने पुढे जाऊन गल्याथा बरोबर लढण्याची तयारी दाखविणे योग्य होते का?**

अ.  दावीदाने एकटयाने गल्याथा बरोबर लढण्याची तयारी दाखवाला नको होती.  जर तो पाहीजे तितका बलाढय नसता तर संपूर्ण इस्त्राएल राष्ट्र हारले असते आणि पलिष्टयांचे सेवक झाले असते.  जोखीम मोठी होती.

ब. दाविदाला माहीत होते की उंची, शक्ति आणि अनुभव महत्वाचा नाही कारण युध्द देवाचे आहे. कोणताही मोठा शिपाई पूढे आला नाही म्हणून त्याने पूढे येणे योग्य होते.


जसे दाविदाने गल्याथा सोबत केले तसे माझ्याही जीवनात अनेक लोक माझी थट्टा करतील आणि मला इजा करण्याची धमकी देतील. ‘जरी गोष्टी अशक्य वाटत असल्या तरी मी भितीवर विजय मिळवू शकतो.’ येशू ख्रिस्त मला धैर्यवान बनवितो.




## पवित्र शास्त्रातून प्रवास करणे (पाठ 5)

त्यानदीमध्ये आपले स्वागत आहे ज्यात आपण बोटीत बसून पवित्र शास्त्रातून प्रवास करणार आहोत! आजच्या धडयाचे शिर्षक, मुख्य मुददा व पाठांतर वचन एकत्र म्हणू या. विदयार्थी पुस्तकं वाटा व त्यांना लपलेले कोडे सोडविण्यापासून सुरवात करायला लावा. नंतर तुमच्या विद्याथ्र्यांना पुस्तकात 2 कृती करायला लावा आणि रंग भरायला सांगा.

## उत्तरं




(मध्यम पुस्तकाचे उत्तरं सोपे व कठिण पुस्तकं वापरून शोधता येतील)

## उष्णकटिबंधीय उपहार गृह (पाठ **5**)

### दावीदाच्या शस्त्रांची पिश्वी




साहित्यः

- पोळी प्रत्येकी एक
- गोल आकाराचा खाण्याचा पदार्थ प्रत्येकी 5

सल्लाः द्राश, गोळया, चीजचे गोल इ.



कृतीः

- तुम्ही आधी पोळी गरम करून घ्यावी म्हणजे ती पिश्वीच्या आकाराची करणे सोपे जाईल.
- प्रत्येक मुलाला 5 फाराळाचे गोल घेऊन ते त्यांच्या पोळीच्या पिश्वीत टाकून ती गोल करू दया, ही दावीदाची 5 दगडं असलेली शस्त्राची पिश्वी तयार होईल.
- इतर मुलं 9 फूट उंच नाहीत म्हणून मुलांना एकमेकांवर हे दगडं फेकू देऊ नका.

## दलदलीतील खेळ (पाठ **5**)




### 1. हत्तीला घरी आणा.

पाच मुलांचा गट तयार करा. चार लोक पाचव्याला घेऊन जातील. (हत्तीला) एक एक जण एक एक हात आणि पाय धरेल. हत्ती बनलेल्या व्यक्तिच्या पोटावर गोल फळ ठेवा.

ते फळ खाली न पडू देता संमाप्ति रेषे पर्यंत जावे. जर फळ पडले तर संघ हारेल. जो संघ फळ खाली न पाडता पलिकडे जाईल तो विजयी ठरेल.

### 2. गावाला पाणी घेऊन जा

मुलांच्या दोन लांब रांगा तयार करा. प्रत्येकाला एक रिकामा कप दया. पहिल्या कपामध्ये पाणी भरा मग त्याने पुढच्या व्यक्तिच्या डोक्यावरील कपामध्ये न पाहता पाणी टाकावे, त्याने पुढच्या असे सुरू ठेवावे. ज्या संघाच्या कपामध्ये शेवटी सर्वात ज्यास्त पाणी असेल तो विजेता ठरेल.

## धबधबा हस्तकला ( पाठ 5)

### मगर मुखवटा

प्रत्येक मुलांला खालिल गोष्टी छापून दया.

1 मगराचा मुखवटा

मगराच्या दातांचा एक संच

50 सेमी रिबीनचा एक तुकडा

2 डोळे

1. मुलांना मुखवटा कापून तो रंगवायला सांगा. शिक्षकांनी रिबीनचे छिद्र मुखवटयाच्या थोडया आतील बाजूस करावे जेणे करून मुखवटा लवकर फाटणार नाही.



2. मुखवटच्या मागच्या बाजूला वरच्या बाजूस सरळ भागात डोळे कसे लावावे ते मुलांना दाखवा.

3. मग मगराचे दात मुखवटयाच्या मागच्या बाजूला लावा व खालच्या आकारावर निट बसतील ते पहा.

4. शेवटी मुखवटयाच्या एका बाजूला रिबीन जोडा व नंतर प्रत्येक मुलांच्या डोक्याला नीट बसेल अशा मापाने दुसरी बाजू बांधा.

## समारोप 5

जसे दावीदाला गल्याथाने धमकाविले, आणि बोगली मगराला घाबरला तसे तो आपल्यालाही धमकाविण्याचा प्रयत्न करतील. तरी आपण दावीदा सारखे प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावावर भरवसा ठेवू शकतो. आणि जसे आजचे आपले पवित्र शास्त्रातील वचन सांगते आपण खंबीर व्हावे व हिम्मत धरावी कारण आपण जावू तिथे आपला देव परमेश्वर आपल्या बरोबर असेल. सर्वांना एकत्र मिळून आजचा मुख्य मुददा म्हणू दया... 'गोष्टी अशक्य वाटत असल्या तरी मी भितीवर विजय मिळवू शकतो.' "जंगलामधील लढाईत टिकून राहणे" हयात हया आठवडी भाग घेतल्या बद्दल आपले आभारी आहोत. आपण इथे हे शोधले की भिती, पाप, हल्ले हयावर विजय कसा मिळवावा आणि धैये, दयाळूपणा आणि सामर्थ्याने युक्त कसे व्हावे.

हया जंगल साहसात आपण एकत्र मजा करित येशू ख्रिस्तामध्ये आपण कोण आहोत हेही शिकलो. आपण प्रत्येक जण हया कार्यक्रमात भाग घेण्यासाठी आपल्या घरच्या सर्व जवाबदा-या सोडुन चर्चला आलो, आणि निसंदेह त्यामूळे आपले बाकीचे जीवन बदलून गेले आहे. हया विशेष आठवडयाचा भाग झाल्या बद्दल आपले आभारी आहोत.

'जंगलामधील लढाईत टिकून राहणे' हयाच्या नविन कार्यक्रमात आपण पुन्हा भेटूया.

# You were expecting just a fun way to teach kids.



"WE USED TO HAVE 5 KIDS COMING TO SUNDAY SCHOOL," said the children's ministry director of a church in Delhi after just 1 month using Champions Sunday school. "Now we have 25 children regularly! The rich children used to snub the poor children, but now they mingle together. They even help each other solve the puzzles!"

""BUT I DO THE SAME THING, TOO..." a little girl in Mexico said with a sigh. She was looking at herself with a little pocket mirror she made out of tin foil in Sunday school. "...So I can't judge that girl for gossiping." After putting the little mirror back into her pocket, she went to another girl she had gossiped about and apologized for it!

## Use our syllabus and discover surprising spiritual growth in your students!

**Join over 100,000 churches from 20 countries and download life-changing curriculum from www.ChildrenAreImportant.com.**

Children are Important